• वर्ष : ०३ • अंक : २७२ • पुणे • मंगळवार, दि. २३ जून २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक





खासगी टँकरना सवलतीच्या दरात पाणी द्या !

3



२६ वर्षांची अखंड शैक्षणिक परंपरा

4

## ठळक बातम्या

### नको अटी, नको शर्ती; शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा !

मुंबई (आरंभ पर्व) : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीने शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी "नको अटी, नको शर्ती; शेतकऱ्यांना हवी कर्जमुक्ती", "शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा" अशा घोषणा दिल्या.

### तालुक्यात पावसाची जोरदार हजेरी

लेण्याद्री (आरंभ पर्व) : जुन्नर तालुक्यातील लेण्याद्री गोळेगाव कुमशेत व पांगरी माथा आदी परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून ढगफुटी सदृश्य पावसामुळे ओढ्या नाल्यांना पहिल्याच पावसात पाणीच पाणी झाले. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा जाणवत होता दुपारी अचानक ढग दाटून आले व विजेच्या कडकटासह मुसळधार पावसाने जुन्नर तालुक्यात जोरदार आगमन केले. लेण्याद्री ओझर फाटा परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला त्यामुळे परिसरातील शेतांमध्ये पाणीच पाणी दिसत होते.

# ६ टायगर शिवसेनेत

## ना तुडवायला, ना आडवायला, आम्ही शिवसेना वाढवायला निघालो, एकनाथ शिंदेंची फटकेबाजी



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

शिवसेनेच्या परिवारामध्ये सहा नवीन खासदार सामील झाले असून त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल, त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. या खासदारांच्या विश्वासाला तडा कधीही जाऊ देणार नाही, असंही ते म्हणाले. केंद्राशी निगडित प्रश्न असतील वा राज्यातील प्रश्न, कुठेही अडवणूक होणार नाही असा शब्द यावेळी एकनाथ शिंदे यांनी दिला.

ही सगळी ताकद एकत्र आल्यानंतर आपली शिवसेना अधिक भक्कम होईल असंही ते म्हणाले. ऑपरेशन टायगर आता फुलप्रूफ सक्सेस झालं आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. यासंबंधित सर्व कायदेशीर गोष्टी आम्ही केल्या आहेत, असंही शिंदे म्हणाले. ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी यावेळी शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

उद्धव ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. हे सहा जण खऱ्या शिवसेना परिवारात सामील झाले, याबद्दल आपण त्यांचे अभिनंदन करतो असं एकनाथ शिंदे म्हणाले.चार वर्षांपूर्वी आपण शिवसेना वाचवण्यासाठी, धनुष्यबाण वाचवण्यासाठी उठाव केला. आता हा लढा दुसऱ्या टप्प्यात पोहोचला आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.


संजय पाटील हा जनतेशी जोडलेला, ग्राउंड लेव्हलवर काम करणारा कार्यकर्ता आहे. संजय दिना पाटील हा करा दिनांचा कैवारी असून दोस्ती जपणारा आहे. ओमराजे हे त्यांच्या मनाचे राजे आहेत. पण त्यांनी मनात निश्चय केला आणि ते आपल्यासोबत आले. आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांनी विकासासाठी, न्यायासाठी आपली साथ दिली. काही लोकांनी त्यांना हिणवलं, त्यांना रील स्टार म्हणाले. पण ओमराजे हे रियल स्टार आहेत.

संजय देखमुख हे उत्तम असून त्यांना अधिक उत्तम काम करायचं असल्याने ते आपल्याकडे आहे. नागेश पाटील आष्टीकर हे अत्यंत चांगले आहेत. भाऊसाहेब वाकचौरे हे देखील असेच कार्यकर्ते आहे.

हे सर्व खासदार मतदारसंघातील विकासासाठी आपल्याकडे आले आहेत. 2022 साली बाळासाहेबांची विचारधारा सोडून दुसरा विचार आला त्यावेळी आम्ही उठाव केला. त्यावेळी आपल्यासोबत आलेले 40 आमदार परत निवडून येणार नाहीत असं म्हटलं जायचं. परंतु 40 चे 60 आमदार निवडून आले. चांदा ते बांदापर्यंत शिवसेना मोठी झाली. आमची नीती स्पष्ट होती, विचारधारेला घेऊन आम्ही पुढे गेलो.

आता आपल्या या कामात सहा खासदार सामील झाले आहेत. या सहा लोकांची ताकद, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमुळे शिवसेना आणखी बळकट होतील. या खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामं, त्याच्या अडचणी सोडवण्यात येतील. मी दिलेला शब्द पाळतो, त्यामुळे एकनाथ शिंदेंवर विश्वास ठेवतात.





## मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात; महिलांचा मृत्यू

• तिघे गंभीर जखमी

**सावंतवाडी (दै. आरंभ पर्व)**

मुंबई-गोवा महामार्गावरील नेमळे-एरंडोकवाडी येथे आज सोमवारी दुपारी सव्वादोन वाजण्याच्या सुमारास थार कारला झालेल्या भीषण अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाला, थार गाडी वीस फूट खोल कोसळली तर तिघे जण गंभीर जखमी झाले. गोवा-सालीगाव (गिरी) येथून कणकवली-भिरवंडे येथे जात असताना हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, जीए-०३-एएम-८४७८ क्रमांकाची थार कार महामार्गावरून कणकवलीच्या दिशेने जात असताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. कारचा वेग जास्त असल्याने ती रस्त्याबाहेर जाऊन जोरात धडकली. या अपघातात श्रीमती पांडुरंग नानोडकर (वय ४३, रा. गिरी-गोवा) आणि विलासिनी जगन्नाथ सातार्डेकर (वय ५३, रा. भिरवंडे-कणकवली) या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान मृत घोषित करण्यात आले.

अपघातात कारचालक सनी नानोडकर (वय ४०), उज्वला कांबळी (वय ५०) आणि पांडुरंग नानोडकर (वय ६५, सर्व रा. गिरी-गोवा) हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी गोवा-बांबोळी येथे हलविण्यात आले. दरम्यान सनी नानोडकर याच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताची माहिती मिळताच नेमळे येथील स्थानिक ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते झेवियर फर्नांडिस यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना कारमधून बाहेर काढले. '१०८' आणि सामाजिक बांधिलकी प्रतिष्ठानच्या रुग्णवाहिकेने जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात सामाजिक बांधिलकीचे शैलेश नाईक, रवी जाधव, लक्ष्मण कदम, रूपा मुद्राळे आणि रुग्ण कल्याण समितीचे सदस्य देव्या सुर्याजी यांनी अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांना धीर देत मदत केली. दरम्यान, रुग्णालयातील उपचारांबाबत देव्या सुर्याजी व रवी जाधव यांनी नाराजी व्यक्त केली.






## थोडक्यात पण महत्वाचे



### आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामंजस्य करार

जुन्नर (आरंभ पर्व) : आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव ता.आंबेगाव व डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्यात सामंजस्य करार (MOU) झाला असल्याची माहिती प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई व डिसेंट फाउंडेशनचे जितेंद्र बिडवई यांनी दिली. शासकीय यंत्रणा आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे काम करण्याच्या उद्देशाने आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे या सामाजिक संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य करारावर दोघांच्या स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. यावेळी प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, समन्वयक योगेश वाघचौरे, सामाजिक कार्यकर्ते श्रावण घोगरे, तसेच आदिवासी विकास विभागाचे विस्तार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची आयईटीईच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड



पुणे (आरंभ पर्व) : एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स (आईटीई), नवी दिल्लीच्या २०२६-२०२९ या कार्यकाळासाठी गव्हर्निंग कौन्सिल सदस्य म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून या सर्वोच्च राष्ट्रीय संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड झालेले ते केवळ दोन प्रतिनिधींपैकी एक आहेत. शिक्षण, संशोधन, प्रशासकीय नेतृत्व आणि संस्थात्मक विकास क्षेत्रातील ३२ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या प्रा. डॉ. शेटे यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांनी १५० हून अधिक संशोधन निबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिके व परिषदांमध्ये प्रकाशित केले असून, त्यांच्या नावावर तीन पेटंट्स, पाच कॉपीराइट्स आणि तीन पुस्तके आहेत. यापूर्वी त्यांनी व्यवस्थापन परिषद सदस्य, शैक्षणिक परिषद सदस्य, परीक्षा मंडळ सदस्य, प्राचार्य/संचालक, उपप्राचार्य तसेच विभागप्रमुख अशा विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. अध्यापन व विद्यार्थी विकासातील योगदानाबद्दल त्यांना 'बेस्ट टीचर' पुरस्काराने देखील गौरविण्यात आले आहे.

### पाणीप्रश्नाबाबत काकासाहेब चव्हाण यांचे मुख्य अभियंत्यांना निवेदन

पुणे (आरंभ पर्व) : प्रभाग क्रमांक ३३ मध्ये सध्या निर्माण झालेल्या अपुऱ्या व विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत सोपान ऊर्फ काकासाहेब चव्हाण यांनी पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी प्रभागातील नागरिकांना भेडसावत असलेल्या पाणीटंचाईच्या समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. खडकवासला धरणातील पाणीसाठ्याची परिस्थिती गंभीर असली तरी पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या प्रभाग ३३ मधील नागरिकांना अद्याप दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. दिवसाआड होणारा पाणीपुरवठा किमान पूर्ण दाबाने व पूर्ण क्षमतेने करण्यात यावा, जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल, अशी मागणी काकासाहेब चव्हाण यांनी केली. तसेच वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. प्रभागातील प्रत्येक नागरिकाला पुरेसा व नियमित पाणीपुरवठा मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, या प्रश्नाच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी संबंधित विभागाशी समन्वय साधून पुढील काळातही प्रयत्न सुरू राहतील, असे काकासाहेब चव्हाण यांनी सांगितले. नागरिकांच्या मूलभूत गरजांपैकी असलेल्या पाणीप्रश्नावर प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### कॅन्सर हीलर सेंटरचे पुण्यात नवीन केंद्र सुरू; महाराष्ट्रातील ५वे केंद्र



पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रात कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेता, कॅन्सर हीलर सेंटरने पुण्यात आपल्या नवीन केंद्राचे उद्घाटन केले आहे. हे केंद्र देशातील ३०वे आणि महाराष्ट्रातील ५वे केंद्र आहे. या केंद्राच्या उद्घाटनानिमित्त पुण्यात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी संस्थेने वेळेवर सल्लामसलत, कॅन्सरच्या लवकर निदानाबाबत जनजागृती आणि महानगरांबाहेरील भागांमध्ये रुग्णकेंद्रित कॅन्सर उपचारसेवेची गरज अधोरेखित केली. ICMR-NCDIR च्या महाराष्ट्र कॅन्सर प्रोफाइलनुसार, २०२६ मध्ये राज्यात १.३० लाखांहून अधिक नवीन कॅन्सर रुग्णांची नोंद होण्याचा अंदाज आहे. यामध्ये पुरुषांमध्ये ६१,७०३ आणि महिलांमध्ये ६८,७६२ रुग्णांचा समावेश आहे. या अहवालात तंबाखूचे सेवन, दुय्यम धूम्रपानाचा संपर्क, लठ्ठपणा आणि जीवनशैलीशी संबंधित आरोग्य जोखमी हे कॅन्सरशी संबंधित प्रमुख घटक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी सहज उपलब्ध कॅन्सर मार्गदर्शन, वेळेवर निदान आणि सातत्यपूर्ण उपचार सहाय्य अधिक महत्त्वाचे ठरत आहे.

### हॅबिल्डचा दहावा जागतिक विक्रम




मुंबई (आरंभ पर्व) : आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त आरोग्यदायी सवयी विकसित करण्यासाठी कार्यरत असलेल्या हॅबिल्ड या व्यासपीठाने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठत आपला दहावा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. योग सप्ताहादरम्यान एक कोटींहून अधिक नागरिक या योग चळवळीत सहभागी झाले असून, जगातील सर्वात मोठ्या सामुदायिक आरोग्य मोहिमांपैकी एक म्हणून या उपक्रमाची नोंद झाली आहे. "प्रत्येक घरात योग, दररोज योग" या देशव्यापी अभियानांतर्गत ही उल्लेखनीय कामगिरी साध्य करण्यात आली. योग हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

# सातवाहन काळातील प्राचीन अवशेष आढळले

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर शहराच्या पूर्वेकडील आगरगाव जवळील सुसरबाग परिसरात प्राचीन इतिहासाच्या पाऊलखुणा अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने भटकंती करीत असताना तेथील स्थानिक शेतकऱ्याला भाजलेल्या मातीचे वेगवेगळ्या आकाराचे मणी , घराचे कौल, समुद्र शंखाच्या बांगड्याचे अवशेष आढळून आले असंल्याचे इतिहास अभ्यासक बापूजी ताम्हाणे यांनी सांगितले. ताम्हाणे म्हणाली की, जुन्नर शहराच्या पूर्व दिशेस सुसरबाग नावाने ओळखली जाणारी शेतकरी लोकवस्ती आहे. तेथील स्थानिक लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेताची मशागत करत असताना काही शेत



मजुरांना काम करताना सुपारीच्या आकाराचे भाजलेल्या मातीची मणी, फुटलेली भांडी, दोन छिद्र असलेली घराची कौले, विटा, धान्य दळण्याचे जाते , पाटे - वरवटे, समुद्र शंखाच्या बांगड्याचे अवशेष तुटलेल्या स्वरूपात आढळून आले.

सदरच्या अवशेषाचा सखोल अभ्यास केल्यानंतर हे अवशेष जुन्नरच्या सातवाहन काळातील असल्याचे निदर्शनास आले. सातवाहन काळात जुन्नरच्या बाजारपेठेत येणारा माल एका ठिकाणी गोळा केला जात असे त्या मालाची योग्य प्रकारे प्रतवारी करुन निर्यातीसाठी कल्याण, भडोच येथील समुद्र बंदरात पाठवला जात असे त्यात जुन्नर परिसरात तयार झालेले विविध प्रकारचे मणी पाश्चिमात्य देशात निर्यात होत असत.

दोन हजार दोनशे वर्षांपूर्वी च्या सातवाहन काळात कुकडी नदीच्या काठावरील सुसरबाग परिसरात पांढरी मातीच्या टेकडीवर लोकवस्ती स्थळे असल्याचे समजते. येथे आढळून आलेल्या अवशेषावरून सातवाहन काळात कला आणि संस्कृती तसेच त्या काळातील लोकांच्या जीवनशैलीवर नव्याने प्रकाश पाडण्यात मदत होईल. प्राचीन काळात येथील परिसरात मणी बनवण्याचे तंत्रज्ञान प्रगत असल्याने भाजलेल्या मातीची मणी तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या आकाराचे मणी इत्यादी अवशेष बनविण्याच्या कलेचा एक महत्त्वाचा उद्योग येथील परिसरात होता. सुसरबाग परिसरातून सुपारीच्या आकाराचे भाजलेल्या मातीची लाल, काळ्या, पिवळ्या, विटकरी रंगाचे मणी आढळून आलेली आहे. यात काही मण्यांच्या वरील गोलाकार भागावरील रेषांना पांढरा रंग दिला असल्यासारखे वाटतात . या मण्यांना वरच्या बाजूने छिद्र आरपार पाडल्याने रेशमी दोऱ्याने मणी माळेत व्यवस्थित ओता येईल अशी रचना केल्याची दिसून येते. मण्याची माळ अलंकार म्हणून सातवाहन काळात महिला - पुरुष परिधान करीत असत येथे आढळून आलेल्या काही मण्यांपैकी १० सें. मी.गोलाई आणि २ सें. मी. उंचीचे तर काही ७ सें. मी. गोलाई आणि २ सें. मी. उंचीचे असून काही मण्यांची जाडी ३ किंवा ४ सें. मी. पेक्षाही कमी जास्त जाडीच्या मण्यांच्या गोलाकार पृष्ठभागावर गोल रेषांच्या पट्ट्या अतिशय ठळकपणे दर्शवतात. हे मणी एकसारखे आकाराचे नसून साचेबंद किंवा चाकावर हाताने बनवलेले असावे. येथील परिसरात आढळून आलेले काही मणी सुपारी एवढ्या मोठ्या आकाराचे भाजलेल्या मातीचे आढळून आल्याचे बापूजी ताम्हाणे यांनी सांगितले.

> सुसरबाग (खोरेवस्ती) जवळील मानमोडी लेणीसमूहात कोरलेल्या विहारात भिक्खू संघ निवास ( वर्षावास ) करीत होता. त्याच्या भिक्षेसाठी, निर्वाहासाठी आश्रय देणाऱ्या लोकांच्या काही सातवाहन काळातील वस्त्या सुसरबाग, अंगरगाव, दिल्ली पेठ येथील कुकडी नदीच्या काठावरील पाढरी माती टेकडीच्या ठिकाणी होत्या.
>
> **- अरुणा रविंद्र वाघोले, इतिहास विभाग प्रमुख, आळे महाविद्यालयात, जुन्नर (पुणे)**

## केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांची भारत बिल्डकॉन २०२६ ला भेट




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

बांधकाम साहित्य, बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी आयोजित करण्यात आलेल्या भारत बिल्डकॉन २०२६ या भव्य प्रदर्शनाला केंद्रीय कामगार व रोजगार तसेच युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी भेट देऊन विविध दालनांची पाहणी केली. यशोभूमी परिषद केंद्र येथे सुरू असलेल्या या प्रदर्शनाला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादाचे त्यांनी कौतुक केले.

प्रदर्शनातील उद्योजक, उद्योग प्रतिनिधी, उत्पादक आणि परदेशी खरेदीदारांशी संवाद साधल्यानंतर मंत्री मांडविया म्हणाले की, भारत बिल्डकॉन २०२६ हे उद्योगासाठी अत्यंत प्रभावी आणि यशस्वी व्यासपीठ ठरले आहे. विशेष म्हणजे प्रदर्शनाच्या केवळ पहिल्या दोन दिवसांतील अभ्यागतांची संख्या मागील आवृत्तीतील एकूण अभ्यागतांपेक्षाही अधिक असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते म्हणाले, "भारताच्या बांधकाम साहित्य आणि बांधकाम क्षेत्राची वाढती ताकद या प्रदर्शनातून स्पष्टपणे दिसून येत आहे. देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठेत भारतीय उत्पादकांसाठी मोठ्या संधी उपलब्ध असून त्याचा लाभ उद्योगाला मिळत आहे."

## बसस्थानक परिसरात चोऱ्या करणाऱ्या अट्टल चोरटा जेरबंद

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

नारायणगाव ता.जुन्नर येथील बसस्थानक परिसरात प्रवाशांच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरणाऱ्या अट्टल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखा आणि नारायणगाव पोलिसांनी संयुक्त कारवाईत जेरबंद केले.अर्जुन कानिफनाथ भोसले (वय २७, रा. धनगर वस्ती, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याचे विरोधात यापूर्वी ४० हून अधिक विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

आरोपीकडून चोरीस गेलेले सुमारे १८ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नारायणगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ९२/२०२६ व ९३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३




(२) अन्वये २८ एप्रिल २०२६ रोजी गुन्हे दाखल करण्यात आले होते. फिर्यादी मीरा गणपत शिंदे (वय ४८, रा. बोरी साळवाडी, ता. जुन्नर) या नारायणगाव बसस्थानकातून एसटी बसमध्ये चढत असताना त्यांच्या पर्समधील सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केले होते. तसेच भागवत निवृत्ती घाडगे (वय ७५) यांची दीड तोळे वजनाची सोन्याची चैनही चोरीस गेली होती. या गुन्ह्यांचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखा व नारायणगाव पोलिसांनी बसस्थानक व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामध्ये एक संशयित व्यक्ती आढळून आली. गोपनीय माहितीच्या आधारे हा संशयित बसस्थानक परिसरात चोरी करणारा सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, ६ जून २०२६ रोजी सदर आरोपी नाशिक फाटा, भोसरी येथे येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा आणि नारायणगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने दोन्ही चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याकडून चोरीस गेलेले एकूण १८ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. सदर कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक शर्मा आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली सपोनि महादेव शेलार, सपोनि प्रवीण सपांगे, पोसई सोमशेखर शेटे, पोसई जगदेव पाटील, सफोजदार दीपक साबळे, पोहवा राजू मोमीन, संदीप वारे, अक्षय नवले, अभिमन्यू मोटे, नंदा कदम, सुजाता कदम, संतोष भापकर, भारत मोहोळ, मंगेश लोखंडे, सत्यम केळकर, सोमनाथ डोके, सुवर्णा गडगे, कविता गेंगजे व निलेश जाधव यांनी केली.

## सायली भोसले यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघातील सामाजिक व जनहिताच्या कार्याला नवी दिशा देणाऱ्या भाजप महिला मोर्चा मंडल सरचिटणीस सायली भोसले यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

यावेळी पुणे शिक्षण मंडळ अध्यक्ष अरुणभाऊ राजवाडे, पुणे शहर महिला मोर्चा अध्यक्षा मनीषाताई लडकत, मंडलाध्यक्ष विजय मते, नगरसेवक सुभाष नाणेकर, नगरसेविका धनश्री कोल्हे, नगरसेवक भारतभूषण बराटे, प्रभाग अध्यक्ष सचिन दांगट, मा.उपसरपंच उमेश सरपाटील, मंडल सरचिटणीस अभिजीत धावडे, युवा मोर्चा अध्यक्ष निखिल




धावडे, अनुसूचित जाती मोर्चाचे उपशहराध्यक्ष प्रकाश , प्रकाश आगाशे, सचिन राठोड, किरण हगवणे, विशाल कदम, चेतन गोंडाळ, भगवान शिंदे, विशाल भोसले, वासुदेव भोसले, अभिजीत कांबळे, यमराज खरात, अशोक मोरे, प्रकाश गायकवाड, मनिषा मोरे महिला मोर्चा मंडल अध्यक्ष,सौ रोहिणी रहाणे, सौ अश्विनी कौसडीकर, सौ सुनिता पोतनीस, सौ सुप्रिया करमरकर, सौ तृप्ती बर्डे, सौ राधा कनोजिया, सौ स्मिता पासलकर, सौ गौतमी कांबळे, सौ अंकिता देसाई, सौ योजना जाधव कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी सायली भोसले यांच्या जनसेवेच्या कार्याचा गौरव करत जनसंपर्क कार्यालय हे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी माध्यम ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

सौ. सायली भोसले यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार व नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे कार्यालय जनहिताच्या विविध उपक्रमांचे केंद्र बनून नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थितांच्या शुभेच्छा व सहकार्यामुळे कार्यक्रमाला विशेष यश प्राप्त झाले.

## येरवडा खुले कारागृहात अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरतर्फे वृक्षारोपण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्ट अंतर्गत कार्यरत अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरच्या वतीने येरवडा येथील खुले कारागृह परिसरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विविध प्रजातींच्या ५५ वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमास येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्टचे पूर्व विभाग प्रमुख राजेंद्र कोते, उपविभाग प्रमुख सूरज गायकवाड, अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरच्या अध्यक्षा माया तुळपुळे, सचिव धनंजय तुळपुळे, सुधीर गांगर्डे, कोषाध्यक्ष सुमित मुगावे,



निशा श्रेयकर तसेच विविध विभागांतील उद्योजक, कारागृह अधिकारी व अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरचे सुमारे ३० सदस्य उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत बहावा, मोहोगनी, बेल, कडुनिंब, कपूर, आपटा आदी पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी अधीक्षक शामकांत शेडगे यांनी सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या सामाजिक आणि पर्यावरणपूरक कार्याचे कौतुक केले.

## योग दिनानिमित्त नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये योग सत्र



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त धायरी येथील नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शनिवारी विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षिका आर्या वाडेकर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, विविध योगासने तसेच दैनंदिन जीवनातील योगाचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात विविध योगासने करत सत्रात सक्रिय सहभाग नोंदविला. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, तणाव कमी होतो तसेच एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढतो, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याचा मार्ग असल्याचेही सांगण्यात आले.

या कार्यक्रमास शाळेच्या संस्थापिका सुनीता डांगे, प्राचार्या प्रियांका गुजराती तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला असून, दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचा संदेश देण्यात आला.

## वेदपाठशाळा व वैदिक कार्यासाठी राज्य शासनाच्या अनुदानाची गरज – सुधीरदास महंत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील सुमारे सव्वाशे वेदपाठशाळांची आर्थिक स्थिती नाजूक असल्याने शासनाकडून अनुदानाची गरज आहे, त्याचबरोबर वैदिक कार्यातील विद्वानांकरिता महाराष्ट्र शासनाने पुरस्कार सुरु करावेत, अशी मागणी नाशिकच्या काळाराम मंदिराचे प्रमुख विश्वस्त सुधीरदास महंत महाराज यांनी आज येथे केली. आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश सारख्या अनेक राज्यांमध्ये वैदिक कार्यासाठी या प्रकारचे अनुदान आणि पुरस्कार दिले जातात. महाराष्ट्रात आज सुमारे १५ हजारांहून अधिक विद्यार्थी वेदपाठशाळांमध्ये वैदिक अध्ययन करत आहेत, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. आम्ही सारे ब्राह्मण आणि ब्राह्मण व्यावसायिक पत्रिकेच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने ब्राह्मण भूषण पुरस्कार सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, मासिकाचे संपादक




भालचंद्र कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक संजय ओर्पे व पुरस्कारार्थी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी नसरापूर प्रकरणातील स्व. वेदवती शुभम कुलकर्णी या चिमुरडीला श्रध्दांजली वाहण्यात आली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दृकश्राव्य माध्यमातून पुरस्कारार्थींना शुभेच्छा दिल्या. दण्डक्रम पारायणाचा विक्रम रचणारे वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना ब्राह्मण भूषण पुरस्काराने यावेळी गौरविण्यात आले, त्यांच्यासोबत वेदमूर्ती महेश रेखे उपस्थित होते. विठ्ठल रखुमाई मूर्ती, पुणेरी पगडी, उपरणे, मानपत्र आणि रोख रुपये २५ हजार असे पुरस्काराचे स्वरुप होते. याशिवाय ह. भ. प. अमृता करंबेळकर यांना डॉ रामचंद्र देखणे स्मृती युवा कीर्तनकार पुरस्कार, थिंक बँकचे संपादक व युवा उद्योजक विनायक पाचलग यांना इंदुमती-वसंत करिअर भूषण पुरस्कार आणि ९६ वर्षांची परंपरा असलेल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाला भगवान परशुराम ब्राह्मण संस्था पुरस्काराने गौरविण्यात आले. कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष अमित शहाणे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्विकारला. या तिनही पुरस्कारांचे स्वरुप सन्मानचिन्ह, शाल व रोख रु. दहा हजार असे होते. यावेळी मंजिरी धुपकर लिखित गुरु-शिष्य संवाद (दासबोध) या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ब्राह्मणांसाठी असलेल्या सुयश वधू-वर सूचक मंडळाच्या नव्या संकेतस्थळाचे उद्घाटन यावेळी करण्यात आले.

यावेळी बोलतांना सुधीरदास महाराज पुढे म्हणाले की, वैदिक कार्यामध्ये ब्राह्मण समाजाबरोबरच अन्य समाज देखील सहभागी होत आहे. वेदपाठशाळांमध्ये देखील सर्व जातीतील विद्यार्था वेदाध्ययन करत आहेत, ही आनंदाची बाब आहे. आज महाराष्ट्रातील अनेक वेदपाठशाळांना जागेची कमतरता आहे तर आर्थिक स्थिती हलाखीची आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. २३ जून २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



### धामापूर जिल्हा परिषद गट कार्यकर्ता मेळावा उत्साहात संपन्न

संगमेश्वर (आरंभ पर्व) : धामापूर जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा गट) कार्यकर्त्यांचा मेळावा सरंद येथे आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांनंतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणे, विकासकामांचा आढावा घेणे तसेच बदलत्या राजकीय परिस्थितीची माहिती देणे या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार शेखर निकम यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, पक्षाची खरी ताकद ही तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये असते. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हीच खरी लोकसेवा आहे. विकासकामे ही केवळ कागदावर न राहता ती प्रत्येक गावापर्यंत आणि प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजेत, यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

### संघर्षातून उभे राहत आहे राहुल गांधी यांचे नेतृत्व : गोपाळदादा तिवारी



पुणे (आरंभ पर्व) : संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस आणि राज्य विद्यार्थी काँग्रेसच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या वतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनाचा समारोप उत्साहात झाला. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर भाष्य केले. बाळासाहेब ठाकरे कला दालन येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात राहुल गांधी यांच्या जीवनातील विविध पैलू, देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी केलेले प्रयत्न आणि त्यांच्या सार्वजनिक जीवनातील महत्त्वपूर्ण क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आले होते. यावेळी बोलताना गोपाळदादा तिवारी म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात विविध सत्तांमध्ये विभागलेला आणि परकीय राजवटीच्या अधिपत्याखाली असलेला भारत, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद, भगतसिंग, राजगुरू आणि हजारो स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व संघर्षातून स्वतंत्र आणि लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उभा राहिला. या राष्ट्रउभारणीत काँग्रेसचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.



### आयुष पथक राजुर येथे योग प्रात्यक्षिके व प्रतिज्ञा

जुन्नर (आरंभ पर्व) : आयुष पथक राजुर ता. जुन्नर येथे पुणे जिल्हा परिषद राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिन, योग संगम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ व विद्यार्थ्यांसह एकूण १६५ जणांनी आज योग प्रशिक्षक सुनील पवार, सीमा पवार यांचे मार्गदर्शनाखाली योगा प्रात्यक्षिक केली. तसेच योग प्रतिज्ञा घेतली अशी माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ प्रदीप गोसावी यांनी दिली. चाईल्ड फंड इंडिया संस्थेने कार्यक्रम आयोजनास सहकार्य केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी कुळमेथे, सरपंच ज्योत्स्ना मुंढे, आदिवासी शिक्षण संस्थेचे देवराम मुंढे,डिसेंट फाउंडेशनचे जितेंद्र बिडवाई आदी मान्यवर तसेच तालुक्यातील आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यावेळी उपस्थित होते.



### भामकाई देवराई प्रकल्पांतर्गत वृक्षारोपण : विविध संस्थांचा सहभाग

जुन्नर (आरंभ पर्व) : मांदारणे ता.जुन्नर येथील भामकाई देवराई प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील अनेक संस्थांनी वृक्षारोपणात सहभाग घेत देशी प्रजातीची हजाराहून अधिक झाडे लावली. वसुंधरा अभियान बाणेर, शिवभूमी सह्याद्री चॅरिटी, ग्रीन व्हिजन फाऊंडेशन आणि शिवनेरीचे शिलेदार ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने ह्या उपक्रमाची मुहूर्तमेध रोवली गेली. यावेळी उपस्थित पर्यावरण प्रेमिनी पर्यावरणपुरक वृक्ष लागवड करून निसर्ग संवर्धन करण्याचा संकल्प केला. या देवराई प्रकल्पात सर्व देशी झाडांची लागवड करण्यात येणार आहेत. मांदाराणे ग्रामपंचायत या प्रकल्पासाठी भविष्यात चाळीस एकरहुन अधिक गायरान क्षेत्र वृक्ष लावगवडीसाठी उपलब्ध करून देणार आहे. ओतूरचे वनपरीक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी ह्या उपक्रमाची प्रशंसा केली तसेच वन विभागाची जागा ह्या उपक्रमासाठी देण्याची ग्वाही दिली. या प्रसंगी हम है ना..फाऊंडेशनचा वतीने एक पेड शहिद के नाम या संकल्पने अंतर्गत शहिद जवानांच्या नावे काही झाडे लावण्यात आली. या प्रकल्पाचे प्रमुख रमेश डुंबरे,सरपंच सविता ठोसर, संतोष वाळेकर, रवि ढमाले, सुजित नलावडे ,कृष्णा सदाकाळ, शिरीष भोर, पोपट नलावडे,विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, मोहित ढमाले, अनिल तांबे, स्नेहल भोर, कॅप्टन भिकाजी भागवत, आकाश डावखरे, मोहन महाकाळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुण्यातील पाणी कपातीवर पर्याय

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा केवळ २४.३० टक्क्यांवर आल्याने शहरात पाणी कपात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील विविध इमारतींमध्ये असलेल्या अग्निशमन टाक्यांमधील (फायर टँक) 'डेड स्टॉक' पाणी वापरण्याचा पर्याय विचारात घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जयंत इनामदार यांनी पत्रकार परिषदेत केली. या संदर्भात बोलताना इनामदार यांनी म्हटले आहे की, पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये अत्यल्प साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर अनेक भागांत टँकरच्या पाण्याचे दर वाढू लागल्याचेही त्यांनी नमूद केले.

# खासगी टँकरना सवलतीच्या दरात पाणी द्या !

## काकासाहेब चव्हाण, सुभाष नाणेकर यांची महापालिकेकडे मागणी



पुणे (दै. आरंभ पर्व)

शहरात सुरू असलेल्या एक दिवसाआड पाणीपुरवठयामुळे पाण्याची मागणी मोठया प्रमाणात वाढलेली आहे. असे असतानाच ; खासगी टँकर चालकांकडून मोठया इंधनदरवाढ तसेच इतर कारणे पुढे करत पाण्याचे दर वाढविण्यात आले आहेत.

त्यामुळे नागरिकांना मोठया अडचणींचा सामना करावा लागत असून पाणी कपातीच्या काळात पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी वडगाव खुर्द येथील टँकर पॉईंटवरून खासगी टँकरधारकांना सवलतीच्या दरात पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी महापालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांच्यासह भाजपचे नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे पत्राद्वारे केली आहे.

शहरातील काही भागांमध्ये अद्यापही पूर्ण दाबाने व क्षमतेने पाणीपुरवठा होत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक परिसरांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज निर्माण झाली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. निवेदनानुसार, अनेक भागांमधील विहिरी व बोअरवेल कोरड्या पडल्या असून काही ठिकाणी उपलब्ध होणारे पाणी दूषित व वापरण्यास अयोग्य असल्याचे चित्र आहे.

> अद्याप त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नसला तरी हे पाणी नागरिकांनाच दिले जात असल्याने त्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल.
>
> **- नंदकिशोर जगताप ( पाणी पुरवठा विभाग प्रमुख)**

अशा पाण्याच्या वापरामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वडगाव खुर्द येथील टँकर पॉईंटवरून खासगी टँकरधारकांना पाणी भरण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सध्या टँकर भरण्यासाठी आकारण्यात येणारे ६५० रुपये शुल्क कमी करून त्यामध्ये ५० टक्के सवलत द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

टँकर शुल्क कमी झाल्यास सर्वसामान्य नागरिकांना कमी खर्चात पाणी उपलब्ध होईल आणि शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न कमी करण्यास मदत होईल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

पाणीकपातीच्या काळात खासगी टँकरला महापालिकेकडून आकारला जाणारा पाण्याचा दर कमी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी नियमावली करून याबाबतचा प्रस्ताव तयार केला जाणार आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुलांसोबत योगाचा उत्सव



मुंबई (दै. आरंभ पर्व)

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने निक इंडिया आणि इंडियाज इंटरनॅशनल मुव्हमेंट टू युनाईट नेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने स्पार्क अ चेंज फाउंडेशन येथे विशेष योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुलांमध्ये आणि त्यांच्या कुटुंबांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. युवा नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या संस्थेच्या आरोग्यविषयक उपक्रमाच्या पाचव्या वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमात मुलांसाठी संवादात्मक योग सत्र घेण्यात आले. योग प्रशिक्षक रजनी पवार यांनी मुलांना विविध योगासने, शरीर ताणण्याचे व्यायाम आणि श्वसनक्रिया शिकविल्या. योग हा आनंददायी आणि सहज अंगीकारता येणारा जीवनमार्ग आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मुलांच्या आवडत्या बिट्टू आणि हॅपी या पात्रांची उपस्थिती. या दोन्ही पात्रांनी मुलांसोबत योगासने करत त्यांना प्रोत्साहित केले. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या "योगासन आव्हान" स्पर्धेला मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ठराविक वेळेत विविध योगासने करून दाखविताना मुलांनी आपले कौशल्य सादर केले. बिट्टू आणि हॅपी यांच्या सहभागामुळे या उपक्रमात अधिक रंगत आली.

## पावसाळा तोंडावर, तरीही नालेसफाई रखडली



पुणे (दै. आरंभ पर्व)

नऱ्हे, धायरी व वडगाव व समाविष्ट गावातील परिसरातील ओढे व नाल्यांची पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून अद्यापही प्रभावी नालेसफाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केला आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतरही अनेक ठिकाणी गाळ, कचरा व झुडपे साचलेली असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या संदर्भात पुणे महानगरपालिकेमध्ये वारंवार विषय मांडण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले, मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण परिसरामध्ये पाण्याचे तांडव पाहायला मिळाले. अनेक सोसायट्या, घरे आणि रस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. "नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरले, मालमत्तेचे नुकसान झाले. या सर्व नुकसानीची जबाबदारी नेमकी कोण घेणार?" असा सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते यांनी उपस्थित केला आहे.

### शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

याबाबत संबंधित विभागाचे अभियंता राकेश शिंदे यांनी मंगळवारी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, आतापर्यंत आज कोठे नालेसफाई झाली याची माहिती अद्याप देण्यात आलेली नाही.

प्रशासनाकडून नालेसफाई झाल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात अनेक नाले आणि ओढे गाळाने भरलेले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> शिवाजीराव मते म्हणाले, "पावसाळ्यापूर्वी नालेसफाई योग्य पद्धतीने झाली असती, तर आज नागरिकांवर ही वेळ आली नसती. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यापुढे अशी परिस्थिती निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील."

नालेसफाईच्या कामाचे कंत्राट कोणाला देण्यात आले, किती निधी खर्च झाला आणि प्रत्यक्षात किती काम पूर्ण झाले याची माहिती जाहीर करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

तातडीने नालेसफाईची कामे पूर्ण करावीत, अन्यथा सिंहगड रोड येथील पुणे महानगरपालिका कार्यालयावर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शिवाजीराव मते यांनी दिला आहे.

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

### विश्वशांती घुमटाच्या साक्षीने सामूहिक योगासने; 'निरोगी वृद्धत्वासाठी योग'चा संदेश



पुणे (दै. आरंभ पर्व)

'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठात सामूहिक योगासनांच्या प्रात्यक्षिकांद्वारे १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. समग्र विश्वाला शांततेचा संदेश देणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज विश्वशांती घुमटाच्या साक्षीने झालेल्या या योगोत्सवात विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थितांनी निरोगी जीवनासाठी दररोज योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगातील सर्वात उंच 'विश्वशांती घुमट' या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे साजरा करण्यात आला. विज्ञान आणि अध्यात्माचा अनोखा संगम साधणाऱ्या या भव्य घुमटाची संकल्पना व निर्मिती माईर्स शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली आहे.

## कॅलिफोर्निया बदामांसह करा दिवसाची सुरूवात




पुणे (दै. आरंभ पर्व)

सकाळची सुरुवात संपूर्ण दिवसाची दिशा ठरवते आणि योग्य दिनचर्या अंगीकारल्यास मोठा सकारात्मक बदल घडवून आणता येतो. निरोगी सकाळच्या सवयींचे महत्त्व अधोरेखित करत, अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने पुण्यातील शेरेटन ग्रँड येथे 'हर सुबह की सुपर शुरुआत: कॅलिफोर्निया बदाम के 24 न्यूट्रिएंट्स के साथ' या विषयावर एक रंजक आणि उत्साहवर्धक सत्र आयोजित केले. मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली येथील डायटेटिक्स विभागाच्या रीजनल हेड आणि पोषणतज्ज्ञ ऋतिका समद्दार यांनी या सत्राचे संचालन केले, आरजे उत्सवी यांनी सूत्रसंचालन केले.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात संशोधन व कौशल्य विकासाला प्राधान्य द्या

## माजी कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले



यादववाडी (ता. पुरंदर) (दै. आरंभ पर्व)

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात विद्यार्थ्यांच्या मेंदू विकासाला चालना देण्यासाठी संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्य विकासावर भर देणे आवश्यक आहे. विद्यार्थी आपल्या मेंदूचा मर्यादित भाग वापरतात. त्यामुळे जिज्ञासू वृत्ती आणि संशोधनाची आवड जोपासल्यास ज्ञानाचा विस्तार होऊन उज्ज्वल भविष्य घडू शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले यांनी केले.

हरगुडे ग्रामविकास संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, यादववाडीच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या 'अग्नि' क्षेपणास्त्र प्रकल्पात मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ डॉ. दिलीप देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ विचार, भारतीय संस्कृतीचे जतन आणि समाजपरिवर्तनासाठी मोठी स्वप्ने पाहण्याचा संदेश दिला. तसेच त्यांनी सर आयझॅक न्यूटन, थॉमस अल्वा एडिसन, चार्ल्स डार्विन, पायथागोरस यांच्या प्रयोगशाळांना दिलेल्या भेटींचे अनुभव सांगितले. स्टीफन हॉकिंग, एलन मस्क आणि निकोला टेस्ला यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन संशोधनाची दिशा शोधण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी एसएससी परीक्षेत विद्यालयातील प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह परिंचे केंद्रात प्रथम आलेल्या आदेश प्रकाश कुमकर याचा गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना एकूण रु. ५० हजारांची पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष जाफर शेख, खजिनदार अविनाश ताकवले, सचिव मोहन ताकवले, संचालक विवेकानंद ताकवले, कमलाकर ताकवले, ज्ञानेश्वर यादव यांच्यासह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दिलीप नेवसे, सूत्रसंचालन अब्दुलगनी तांबोळी व हनुमंत निगडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिपक भोसले यांनी मानले.



### श्री स्वामी बॅग्ज पुणे यांच्याकडून विद्यार्थ्यांना मदतीचा हात

श्री स्वामी बॅग्ज, पुणे यांच्या वतीने राहुल जगताप यांनी विद्यालयातील गरजू, होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना ५० शालेय दप्तरांचे व टिफिन बॅगचे मोफत वितरण केले. विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सामाजिक सेवाभाव जपत श्री स्वामी बॅग्ज, पुणे दरवर्षी विद्यार्थ्यांना सहकार्य करत आले आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वच मान्यवरांनी यावेळी कौतुक व्यक्त केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### उच्छिलच्या शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा!

जुन्नर (आरंभ पर्व) : उच्छिल ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'करूया योग, राहूया निरोगी' असा संदेश देत 'आंतरराष्ट्रीय योग दिन' अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. योगदिनाचा प्रारंभ सकाळी सामूहिक योगासने आणि प्राणायामाने झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने आणि शिस्तीत योगासने, सूर्यनमस्कार आणि ध्यानधारणा केली. याप्रसंगी पदवीधर शिक्षक सुभाष मोहरे यांनी विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व तसेच मानवी शरीरासाठी व्यायामाची गरज याविषयी मार्गदर्शन केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना निरोगी शरीरासाठी नियमित व्यायामाची गरज अधोरेखित केली. दैनंदिन जीवनात किमान अर्धा तास व्यायाम किंवा योगासने केल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते, शारीरिक ऊर्जा टिकून राहते आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते, असे सांगितले. विशेषतः शालेय वयात योगाचे नियमित आचरण केल्याने विद्यार्थ्यांचा बौद्धिक आणि मानसिक विकास अधिक चांगल्या प्रकारे होतो असेही स्पष्ट केले. यावेळी विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या दिनचर्येत योगासनाचा समावेश करण्याचा संकल्प केला.

### मैत्रीबोध परिवाराद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन



पुणे (आरंभ पर्व) : मैत्रीबोध परिवाराने शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रम, कर्जत येथे एका अनोख्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन केले. या कार्यक्रमात मैत्री, संस्कृती आणि योगामुळे प्राप्त होणाऱ्या सर्वांगीण आरोग्य लाभांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या विशेष प्रसंगी शेकडो लोक एकत्र जमले आणि योगाच्या खऱ्या स्वरूपाचा अनुभव घेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला. मानवतेच्या उन्नतीसाठी आणि व्यक्तीच्या अंतर्मनाचे पोषण करण्यासाठी समर्पित असलेली सामाजिक-आध्यात्मिक संस्था मैत्रीबोध परिवार योगाला आंतरिक परिवर्तन आणि सामूहिक कल्याणाचा प्रभावी मार्ग मानते. संस्थेची आध्यात्मिक मूल्ये आणि दृष्टीकोन हे योगाला जीवनपद्धती म्हणून प्रस्थापित करण्यासाठी कार्यरत असलेल्या आयुष मंत्रालयाच्या भावनेशी सखोलपणे सुसंगत आहेत.




### शर्विल पंचकर्म सेंटरमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

धायरी (आरंभ पर्व) : शर्विल पंचकर्म अँड आयुर्वेद वेलनेस सेंटर आणि पतंजलि संचालित शर्विल चिकित्सालय,धायरी सिंहगड रोड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या "Yoga for Healthy Ageing" (निरोगी वृद्धत्वासाठी योग) या संकल्पनेला अनुसरून योग शिबिर तसेच मोफत रक्ततपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी डॉ. मयुरा परळकर धाट यांनी योगाचे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद केले. नियमित योगाभ्यासामुळे वाढत्या वयातही शरीराची कार्यक्षमता, लवचिकता व मानसिक स्थैर्य टिकून राहण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. तसेच निरोगी जीवनशैलीसाठी योग, संतुलित आहार व आयुर्वेदीय दिनचर्येचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. यासोबत आयोजित मोफत रक्ततपासणी शिबिराचाही 100 हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक-युवती तसेच अनेक योगप्रेमींनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या Fortune Diagnostic यांचे विशेष आभार मानण्यात आले. तसेच उपस्थित सर्व नागरिक, सहभागी आणि शर्विल पंचकर्म अँड आयुर्वेद वेलनेस सेंटरच्या सहकाऱ्यांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

### जागतिक परिस्थितीत आर्सेलर मित्तलच्या २० वर्षांच्या नेतृत्वाचा गौरव



मुंबई (आरंभ पर्व) : जगातील आघाडीची पोलाद उत्पादक कंपनी आर्सेलरमित्तल आपल्या स्थापनेचा २० वा वर्धापनदिन साजरा करण्याच्या तयारीत असताना, कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष लक्ष्मी मित्तल यांनी विशेष दृकश्राव्य संदेशाद्वारे गेल्या दोन दशकांच्या प्रवासाचा आढावा घेतला. न्यूयॉर्क येथे १५ व १६ जून रोजी आयोजित जागतिक पोलाद अभ्यास मंच २०२६ मध्ये हा संदेश प्रसारित करण्यात आला. ३१ जुलै रोजी होणाऱ्या २० व्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या या संदेशात मित्तल यांनी २००६ मध्ये मित्तल पोलाद आणि आर्सेलर यांच्या विलीनीकरणानंतर निर्माण झालेल्या उद्योगसमूहाच्या यशस्वी वाटचालीवर प्रकाश टाकला. मोठ्या प्रमाणावरील विस्तार, विविधीकरण आणि जागतिक उपस्थितीमुळे कंपनीला आर्थिक मंदी, करोना महामारी तसेच चीनच्या पोलाद उद्योगाच्या वेगवान वाढीसारख्या मोठ्या आव्हानांचा प्रभावीपणे सामना करता आल्याचे त्यांनी सांगितले. भारताबाबत बोलताना मित्तल म्हणाले की, गेल्या दोन दशकांत चीनने उल्लेखनीय प्रगती केली असून आता भारताच्या विकासाचा काळ सुरू झाला आहे.

## २६ गुणवंत विद्यार्थ्यांना सायकल भेट देत केदारनाथ संस्थेचा भव्य गुणगौरव सोहळा संपन्न

# २६ वर्षांची अखंड शैक्षणिक परंपरा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची प्रेरणा निर्माण व्हावी, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला इयत्ता १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव समारंभ उत्साहात संपन्न झाला. संस्थेच्या या उपक्रमाचे यंदाचे २६ वे वर्ष असल्याने विशेष उपक्रमांतर्गत २६ गुणवंत विद्यार्थ्यांना २६ सायकली भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार भिमराव अण्णा तापकीर आणि प्रा. डॉ. सुधाकर जाधवर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे शहर तसेच ग्रामीण भागातील सुमारे १५०० हून अधिक विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांची विभागनिहाय निवड करून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना सायकल प्रदान करण्यात आली, तर इतर गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, चषक, सन्मानचिन्हे आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. गेली सलग २६ वर्षे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात येणारा हा उपक्रम आज अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनासाठी कठोर परिश्रम, सातत्य, शिस्त आणि सकारात्मक विचार यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त लाभ घेतला.

> कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर दळवी यांनी केले. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करताना त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणे, गुणवत्तेला प्रोत्साहन देणे आणि शिक्षण क्षेत्रात सकारात्मक स्पर्धा निर्माण करणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश असून, गेल्या २६ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक व विद्यमान नगरसेवक हरिदास चरवड यांनी संस्थेच्या विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, "केवळ सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या प्रेमातून हा उपक्रम सुरू करण्यात आला. काही मित्रांनी मिळून सुरू केलेल्या या उपक्रमाला आज २६ वर्षे पूर्ण झाली असून हजारो विद्यार्थ्यांच्या यशामध्ये आमचा छोटासा वाटा आहे, याचा आम्हाला अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांच्या हितासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी हा उपक्रम यापुढेही अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहील."

यावेळी संस्थेतर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'आदर्श विद्यालय सिंहगड करंडक - २०२६'** हा पुरस्कार खडकवासला येथील रयत शिक्षण संस्थेच्या यशवंत विद्यालयास प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास नगरसेवक तथा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय अध्यक्ष सचिन मोरे, मा. नगरसेवक बाळासाहेब नवले, विश्वास ग्रुपचे बाळासाहेब पोकळे, नगरसेविका जयश्री भूमकर, नगरसेविका कोमल नवले, सणस विद्यालयाचे माजी शिक्षक कांबळे सर, केरबा चरवड, दशरथ मनेरे, विद्याचरण मणेरे, दीपक चव्हाण, प्रवीण नाईक, मा. सरपंच गोकुळ करंजावणे, भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष सारंग नवले, यशवंत विद्यालयाचे प्रा. श्री. नंदकुमार फडतरे, जेष्ठ शिक्षिका सौ. येवले मॅडम सौ. शेळके मॅडम सौ. बनकर मॅडम व श्री. वडेकर सर, अनंता भोईर, पंकज फुले, दत्तात्रय देशपांडे, अॅड. सागर चंदनशिवे, सुशांत कुटे, सतीश कुटे, संदीप कुटे, गणेश कुटे, प्रकाश लिम्हण, संदीप चरवड, डॉ. विवेक काळे,श्रीकांत पवळे, आकाश लोणारे, शिवानंद पाटील, राजेश कुटे , केदार जाधव, चंद्रकांत पवळे, सुनिल कांबळे, पूनमताई चरवड, अश्विनी पवळे, छाया चरवड, वाबळेताई, गौरीताई पवळे, जान्हवीताई जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

### 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' : प्रेमकथेचा भावनिक प्रवास २४ जूनपासून

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

कामाच्या ठिकाणी निर्माण होणारे प्रेम, त्यातील गुंतागुंत, महत्त्वाकांक्षा आणि आत्मसन्मान यांचा वेध घेणारी 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' ही नवी मराठी ओरिजिनल वेबसीरिज २४ जून २०२६ पासून ZEE5 वर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सिद्धार्थ मेनन आणि जान्हवी उदय यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन गौरव पत्की यांनी केले असून निर्मिती क्रिएटिव्ह माइंड प्रॉडक्शन्सने केली आहे. 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' ही कथा अनन्या आणि ऋषी या दोन महत्त्वाकांक्षी तरुण व्यावसायिकांच्या आयुष्याभोवती फिरते. कार्यालयीन वातावरणात झालेली त्यांची ओळख हळूहळू मैत्रीत आणि पुढे प्रेमात रूपांतरित होते. मात्र, व्यावसायिक मर्यादा, पदानुक्रम, करिअरची ध्येये आणि वैयक्तिक भावना यांच्या संघर्षामुळे त्यांच्या नात्यापुढे अनेक आव्हाने उभी राहतात. कॉफी ब्रेकमधील संवाद, चोरट्या नजरा, लांबणाऱ्या गप्पा आणि भावनिक जवळीक यामुळे अनन्या आणि ऋषी यांच्यातील नाते अधिक दृढ होत जाते.




### नऱ्हे येथे जागतिक योग दिनानिमित्त 'योगोत्सव २०२६' उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



जागतिक योग दिनाचे औचित्य साधत मानाजीनगर, नऱ्हे येथे उपसरपंच सुशांत कुटे यूथ फाउंडेशन व लोकमत सखी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला 'योगोत्सव २०२६' मोठ्या उत्साहात पार पडला. 'निरोगी शरीर आणि शांत मन' हा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे योग प्रशिक्षक विनोद देवरे तसेच ओम योगा सेंटरच्या अश्विनी निम्हण यांनी योगाचे महत्त्व, आरोग्यदायी जीवनशैली आणि नियमित योगाभ्यासाचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले. उपस्थितांना शिथिलीकरणाचे व्यायाम, ताडासन, वृक्षासन, अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम तसेच ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. ओम योगा सेंटरच्या सभासदांनी विविध योगासनांचे सादरीकरण करून उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत योगाबाबत जागरूकता आणि सकारात्मकता व्यक्त केली.

या योगोत्सवाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सिंहगड भागाचे सह बौद्धिक प्रमुख मकरंदजी कुलकर्णी, नऱ्हे नगर कार्यवाह संजयजी सुपलकर, नऱ्हे नगर सह वस्ती प्रमुख तुकारामजी घारे तसेच नऱ्हे नगर सेवा विभागाचे जयंतजी श्रोत्री यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत नियमित योगाभ्यासातून निरोगी व सुदृढ समाजनिर्मितीचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैताली बोबडे यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी कोमल सुशांत कुटे व माजी उपसरपंच अनिता कुटे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच स्वयंसेवक व स्थानिक नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले.

या उपक्रमाबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत भविष्यातही नियमित योगवर्ग आणि अशा आरोग्यवर्धक उपक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

### कालबाह्य परवानगीच्या आधारे वृक्षतोड?

- **चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करा; नागेश चव्हाण यांची मागणी**



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

जवळगाव मध्यम प्रकल्प परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आल्याचा आरोप होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी केली आहे.

चव्हाण यांनी उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे गंभीर आक्षेप नोंदवत सांगितले की, पाटबंधारे विभागाकडून सन २०२५-२६ मधील वृक्षतोड परवानगीचा दाखला देण्यात येत आहे. मात्र सदर परवानगी ही केवळ ३० दिवसांच्या कालावधीसाठी वैध आहे . मात्र हे पत्र 2025 मधील आहे..त्याच परवानगीच्या आधारे सध्या वृक्षतोड करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. व दिलेला परवाना हा भरावावरील पाली व झुडपे तोड यांचा परवाना होता. मात्र तरीही भरावा खाली असलेली अनेक अनेक वृक्षतोड करण्यात आली. त्यामध्ये अनेक झाडे बाभूळ, लिंब ,चंदनासारख्यादुर्मिळ वनस्पतींचा ही समावेश आहे.. त्यामुळे सद्यस्थितीत सुरू असलेल्या वृक्षतोडीसाठी नवीन व वैध परवानगी आहे का, असा सवाल उपस्थित झाला आहे. संबंधित आदेशामध्ये तोडण्यात आलेल्या वृक्षांच्या बदल्यात नवीन वृक्ष लागवड करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट नमूद आहे. तसेच लागवड न झाल्यास त्यासाठी आवश्यक खर्चाची हमी रक्कम जमा करण्याची अटही आहे. मात्र प्रत्यक्षात तोडलेल्या वृक्षांच्या बदल्यात नवीन वृक्ष लागवड करण्यात आल्याचे कुठेही दिसून येत नसल्याचा आरोप चव्हाण यांनी केला आहे. जवळगाव मध्यम प्रकल्प परिसरात पर्यावरणाची हानी करून मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याने नागरिकांमध्येही संतापाची भावना निर्माण झाली आहे. पर्यावरण संवर्धनाच्या नियमांना बगल देत वृक्षतोड होत असल्यास संबंधित अधिकारी आणि जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

> "पर्यावरणाची हानी करून कालबाह्य परवानगीच्या आधारे वृक्षतोड करणाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत. अन्यथा पाटबंधारे विभाग कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल."
> **- नागेश चव्हाण, सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (जि. सोलापूर).**

या प्रकरणात पाटबंधारे विभागाचे अधिकारी नेमकी कोणती भूमिका घेणार, कालबाह्य परवानगीच्या आधारे वृक्षतोड झाली का, तसेच परवानगीतील अटींचे पालन झाले का याची चौकशी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. अन्यथा सोलापूर जिल्हा पाटबंधारे विभाग कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी दिला आहे.

### अविवा इंडियाकडून नवीन शाखांसह पुण्यात विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



अविवा लाईफ इन्शुरन्सने बाणेर आणि शिवाजीनगर येथे दोन नवीन शाखांचे उद्घाटन करून पुण्यात आपला विस्तार केला आहे. हा विस्तार शहरातील नागरिक आणि कुटुंबांना अधिक सुलभपणे वैयक्तिकृत संरक्षण व आर्थिक नियोजन उपाययोजना देण्याच्या अविवाच्या वचनबद्धतेला अधिक दृढ करतो. पुण्यातील दोन प्रमुख विकास मार्गिकांमध्ये असलेल्या या नवीन शाखा वैयक्तिकृत सल्ला आणि डिजिटल सेवा यांचा सुरेख संगम साधण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. ग्राहक जलद सेवा साहाय्य आणि अधिक सल्लागार स्वरूपाच्या संवाद अनुभवाचा लाभ घेताना जीवन विमा योजनांच्या विस्तृत श्रेणीचा लाभ घेऊ शकतात. अविवा आपल्या विश्वसनीय सेवा आणि संरक्षण उपाययोजनांद्वारे ग्राहकांचा विश्वास सातत्याने वाढवत असतानाच्या काळात हा विस्तार झाला आहे. हा विश्वास कंपनीच्या तिच्या ९९.१८% च्या क्लेम सेटलमेंट रेशोमध्ये दिसून येतो. या प्रसंगी बोलताना अविवा इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. असित रथ म्हणाले: पुणे हे भारतातील सर्वात गतिमान आणि वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक आहे. या शहरात दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा आणि संरक्षणाबद्दल जागरूकता वाढत आहे. आमच्या बाणेर आणि शिवाजी नगर शाखांचे उद्घाटन ग्राहकांसाठी संरक्षण, आरोग्य आणि विमा उपाय अधिक सुलभ करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. डिजिटल वापर वाढत असला तरी व्यक्ती आणि कुटुंबांना माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी विश्वासार्ह मानवी मार्गदर्श महत्त्वाचे ठरते.

# दिव्यांगांना सन्मानाने जगण्याचे साधन उपलब्ध करून द्यावे : राहुल देशमुख

## जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून जागतिक पितृदिनानिमित्त विशेष कार्यक्रम संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शारीरिक उणीवांवर मात करून विविध क्षेत्रांत कर्तृत्वाचे शिखर गाठणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना केवळ पुरस्कार देणे पुरेसे नाही, तर त्यांना सन्मानाने उदरनिर्वाह करता येईल अशी साधने उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते व एनएडब्ल्यूपीजीचे प्रमुख राहुल देशमुख यांनी व्यक्त केले. साईनाथ मंडळ ट्रस्ट, एकता मित्र मंडळ , श्री शिवाजी मित्र मंडळ , वीर शिवराज मित्र मंडळ आणि अचानक मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून जागतिक पितृदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग मुलांच्या पित्यांचा गौरव करण्यात आला.




यावेळी साहित्यिक डॉ. संगीता बर्वे, उदय जगताप, सचिन पवार, विक्रम गोगावले, हर्षद नवले, नरेंद्र व्यास, विनायक इंगवले, गोविंदा वरण दाणी , अमित जाधव, विविध मंडळाचे अध्यक्ष व आयोजक पियुष शाह, किरण सोनिवाल, सुधीर ढमाले, प्रल्हाद थोरात, ऋषिकेश भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते. अंध सनदी लेखापाल व शास्त्रीय गायक भूषण तोष्णीवाल यांचे वडील नंदकिशोर तोष्णीवाल, कर्णबधिर भरतनाट्यम नर्तिका प्रेरणा सहाणे यांचे वडील केशव सहाणे, दिव्यांग नर्तिका सायली आगवणे यांचे वडील नंदकिशोर आगवणे तसेच राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू गौरी गाडगीळ यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित 'यलो' चित्रपटामुळे प्रसिद्ध असलेल्या गौरीचे वडील शेखर गाडगीळ यांचा राहुल देशमुख आणि साहित्यिक डॉ. संगीता बर्वे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

देशमुख म्हणाले, "दिव्यांग असूनही सर्वसामान्य व्यक्तींनाही कठीण वाटतील अशी अनेक कार्ये या मुलांनी करून दाखवली आहेत. त्यांच्या भविष्यासाठी शासनाने विशेष धोरण आखून त्यांना चांगल्या पदांवरील सरकारी नोकऱ्या, आर्थिक सहाय्य आणि मानधन उपलब्ध करून द्यावे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




### भक्ती शक्ती योग परिवारातर्फे योगसंगम २०२६ उत्साहात संपन्न

धायरी (आरंभ पर्व) : आयुष मंत्रालयातर्फे आयोजित केलेल्या योगसंगम 2026 हा कार्यक्रम तब्बल 125 साधकांच्या मांदियाळीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आयोजकांनी योग दिनाचे महत्त्व विषद करताना सांगितले की, योग हा केवळ व्यायाम नव्हे, तर तो एक जीवनशैली आहे. योगाद्वारे शरीर, मन आणि आत्मा यांच्यात समतोल राखता येतो. आजच्या धकाधकीच्या जीवनात योग हे मानसिक आणि शारीरिक आरोग्य टिकवण्यासाठी एक प्रभावी साधन आहे. योगसाधकांनी विविध योगासनांवर अतिशय सुंदररित्या प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची मने जिंकली. योगशास्त्र हे केवळ आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यापुरते मर्यादित न ठेवता योगाचा नियमित सराव केल्याने आपले शरीर व मन सुदृढ व निरोगी राहते तसेच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. त्यामुळे नियमित योग करा व स्वस्थ रहा असे आवाहन डॉ. सचिन काटे यांनी यावेळी केले. याप्रसंगी योग परिवारातील उत्कृष्ट योगशिक्षक तसेच उत्कृष्ट योगसाधकांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. प्रदीप आवटे, माधुरी आवटे, अनिकेत चव्हाण आदी मान्यवर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये अलका कटाप, अश्विनी सुतार, भरत काळे, रेणुका टाके, उर्मिला कात्रे, क्षितिजा अभंग, विद्या मते, जयश्री काळे, संदीप दारवटकर, संतोष मोहिरे,सचिन सोनवणे यांनी विशेष सहकार्य केले.

### बीएसएचने भारतात लॉंच केला नवीन चार दरवाजाचा प्रीमियम फ्रीज




पुणे (आरंभ पर्व) : बीएसएच होम अप्लायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड' ने वेगाने वाढणाऱ्या साईड-बाय- साईड रेफ्रिजरेटरने बाजारात पाऊल ठेवले आहे. कंपनीने आपले नवीन 'बॉश' आणि 'सीमेन्स' ब्रँडचे चार दरवाजांचे साईड-बाय-साईड फ्रिज लॉंच केले आहेत. प्रीमियम साईड-बाय-साईड फ्रीजचा लूक आणि बॉटम फ्रीझर (खाली फ्रीझर असणारी डिझाईन) ची सोय, या दोन्ही गोष्टी एकत्र करून ही नवीन खास शहरातील भारतीय कुटुंबांच्या गरजेनुसार तयार करण्यात आली आहे. आधुनिक शहरी घरांमध्ये आणि मॉड्युलर किचनमध्ये सहज बसेल अशा प्रकारे कमी जागेत जास्त साठवणूक क्षमता या फ्रीजमध्ये देण्यात आली आहे. हा देशातील असा एकमेव फ्रीज आहे जो तुमच्या किचनच्या ओट्याशी आणि कॅबिनेटशी अगदी तंतोतंत मेळ खातो, ज्यामुळे हा फ्रीज वेगळा न दिसता किचनचाच एक भाग वाटतो. यामध्ये काऊंटर-डेप्थ डिझाईन, जवळपास शून्य अंतराने इंस्टॉलेशन, ११५° वर असलेले भिंतीपासून संरक्षित दरवाजे, बदलण्याजोगे तापमान कप्पे आणि फ्रीझरसाठी खास कप्पे देण्यात आले आहेत. यामुळे भारतीय कुटुंबांना खाद्यपदार्थ साठवणे, ते व्यवस्थित ठेवणे आणि ताजे ठेवणे खूप सोपे जाईल. तसेच, हा फ्रीज तुम्ही किचनमध्ये स्वतंत्रपणे कुठेही ठेवू शकता, ज्यामुळे हा प्रत्येक आधुनिक भारतीय स्वयंपाकघरासाठी योग्य पर्याय ठरतो.



### माजी सरपंच गेनदेव आटोळे यांनी केला भाजपा प्रवेश

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील रावणगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गेनदेव आटोळे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्ते सह भारतीय जनता पार्टीचे दौंड तालुक्याचे आमदारॲड राहुल कुल यांच्या उपस्थितीमध्ये पक्षप्रवेश केला,गेनदेव आटोळे यांनी त्यांच्या उपसरपंच तसेच सरपंच काळामध्ये विविध विकास कामे मार्गी लावले होते, पंचायत समितीचे माजी सदस्य मानसिंग गाढवे, भारतीय जनता पार्टीचे किसान मोर्चाचे अध्यक्ष अरुण आटोळे, ॲड बापूराव भागवत, भीमा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक संपत आबा आटोळे, लक्ष्मण रांधवन रावण गावचे माजी उपसरपंच अशोक आटोळे, सोसायटीचे माजी चेअरमन मुगाजी आटोळे, माजी उपसरपंच संग्राम भोपाळ, राजेंद्र आटोळे, दादासाहेब धायतोंडे, माजी चेरमन बाळासाहेब आटोळे, ग्रामपंचायत चे माजी सदस्य विकास आटोळे, अक्षय पानसरे,सुजित सांगळे, राज योग आटोळे, किरण काळे, निलेश पोमणे,संजय गाढवे, अजित आटोळे आधी यावेळी उपस्थित होते, आरोग्य दूत आमदार ॲड राहुल दादा कुल यांच्या मार्गदर्शनाखाली रावणगाव गावाचा तसेच ग्रामस्थांचा विविध योजना राहून विकास करण्याचे काम करणार असल्याची माहिती गेनदेव आटोळे यांनी दिले.



### इंडस्ट्री-इंटिग्रेटेड बी.टेक प्रोग्राम लॉंच

पुणे (आरंभ पर्व) : अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (यूजीएसओटी) आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी (एडीवायपीयू) यांनी आज चार वर्षांचा निवासी बी.टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) प्रोग्राम लॉंच करण्यासाठी धोरणात्मक सहयोगाची घोषणा केली. विद्यार्थ्यांना सुरुवातीपासून उद्योग-संबंधित एआय इंजिनिअरिंग कौशल्यांसह यूजीसी मान्यताप्राप्त पदवी प्रदान करण्यासाठी हा प्रोग्राम डिझाइन करण्यात आला आहे. पारंपारिक इंजिनिअरिंग शिक्षण आणि एआय-चालित कार्यक्षेत्रातील झपाट्याने बदलणाऱ्या गरजा यांमधील वाढती तफावत दूर करणे या प्रोग्रामचा मुख्य उद्देश आहे. या प्रोग्रामची पहिली बॅच ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ मध्ये सुरू होणार आहे. कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाकडून (सीबीएसई, आयसीएसई किंवा राज्य मंडळे) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) विषयांमध्ये किमान ५० टक्के गुणांसह इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत.

# राजाभाऊ राऊतांच्या विजयाने सोलापूरसह बार्शी तालुक्यात जल्लोष

## जिल्ह्याच्या विकासामध्ये आमदार राऊत योगदान देतील : पालकमंत्री जयकुमार गोरे






**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

राजकारणात पराभव हा अनेकदा यशाचा पाया ठरतो, याची प्रचिती सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत भाजपा-महायुतीचे उमेदवार राजाभाऊ (राजेंद्र) राऊत यांच्या विजयातून पुन्हा एकदा आली आहे. बार्शी विधानसभा मतदारसंघातून विजय निश्चित मानला जात असतानाही झालेला पराभव राऊत यांच्यासह त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागला होता. मात्र त्याच पराभवाला प्रेरणा मानत कार्यकर्त्यांनी नेत्यावरील विश्वास कायम ठेवला आणि अखेर विधानपरिषदेच्या रूपाने बार्शीला आमदार मिळाला.


राजाभाऊ राऊत यांच्या विजयाची घोषणा होताच बार्शी तालुक्यासह जिल्हाभरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण आणि घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. अनेक कार्यकर्त्यांनी हा क्षण भावनिक असल्याचे सांगत पराभवानंतरच्या संघर्षाच्या आठवणींना उजाळा दिला. राजाभाऊ राऊत यांनी पराभवानंतरही जनतेशी असलेला संपर्क आणि विकासकामांची बांधिलकी कायम ठेवली. त्यांना कार्यकर्त्यांची आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधींची मिळालेली साथ हीच त्यांच्या विजयाची खरी ताकद ठरली. याच जनाधाराच्या बळावर बार्शीला जिल्हा परिषद अध्यक्षपदानंतर आता विधानपरिषद आमदारपद मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. विजयानंतर सोलापूर येथे झालेल्या कार्यक्रमात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजाभाऊ राऊत यांचे अभिनंदन केले. यावेळी विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला.

त्यावेळी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सहकार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे व माहितीच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.. व सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी आमदार राऊत योगदान देतील असा विश्वास व्यक्त केला. आपल्या भावना व्यक्त करताना राजाभाऊ राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, महायुतीचे पदाधिकारी आणि मतदारांचे आभार मानले.

"हा विजय जनतेचा आणि कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा आहे. पुढील काळात सर्वांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेन. सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी विधानपरिषदेतून प्रभावीपणे काम करणे हे माझे ध्येय असेल," असे राजाभाऊ राऊत यांनी सांगितले.

पराभवाच्या वेदनेतून उभारी घेत विधानपरिषदेपर्यंत पोहोचलेल्या राजाभाऊ राऊत यांच्या विजयामुळे बार्शी तालुक्याच्या राजकीय इतिहासात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## महायुतीचा विधान परिषदेत दणदणीत विजय



- १७ पैकी १६ जागांवर झेंडा, नाशिकमध्ये बंडखोर गोकुळ गीते यांचा धक्कादायक विजय

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत महायुतीने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. १७ पैकी तब्बल १६ जागांवर महायुती समर्थित उमेदवार विजयी झाल्याने राज्याच्या राजकारणात महायुतीची ताकद अधिक भक्कम झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळवण्यात अपयश आले असून अनेक ठिकाणी पिछेहाट झाली आहे. १८ जून रोजी पार पडलेल्या या निवडणुकीत १७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित ११ जागांचे निकाल जाहीर झाल्यानंतर भाजपने सर्व ११ जागांवर विजय मिळवत शंभर टक्के यशाची नोंद केली. राष्ट्रवादी काँग्रेसने लढविलेल्या दोन्ही जागा जिंकल्या, तर शिवसेनेला चारपैकी तीन जागांवर समाधान मानावे लागले. निकालानुसार भाजपचे ११, शिवसेनेचे ३, राष्ट्रवादी काँग्रेसचे २ आणि एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. विशेष म्हणजे हा अपक्ष उमेदवार भाजपचा बंडखोर असल्याने नाशिकचा निकाल संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय ठरला आहे. या निवडणुकीतील सर्वात नाट्यमय आणि चक्रावून टाकणारा निकाल नाशिक मतदारसंघात लागला.

## श्री रामेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेचे शंभर कोटींचे उद्दिष्ट

- सभासदांच्या हितासाठी विविध उपक्रम
- चेअरमन बाळासाहेब घुले पाटील यांची माहिती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोडवरील नांदेड परिसरात कार्यरत असलेली श्री रामेश्वर नागरी सहकारी पतसंस्था प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून आगामी काळात संस्थेचे शंभर कोटी रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन बाळासाहेब घुले पाटील यांनी दिली.

नुकतीच चेअरमनपदी निवड झाल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा मांडला. त्यांनी सांगितले की, संस्थेची एकूण उलाढाल ६५ कोटी ६० लाख रुपये असून खेळते भांडवल ५५ कोटी रुपये आहे. संस्थेची कर्जवाटप रक्कम २८ कोटी ३४ लाख रुपये असून वसुली ३ कोटी १४ लाख रुपये आहे. तसेच संस्थेने १ कोटी रुपयांचा नफा मिळविला आहे.

संस्थेकडे ३६ कोटी ७२ लाख रुपयांच्या ठेवी, १२ कोटी १८ लाख रुपयांचा स्वनिधी तसेच २२ कोटी ६७ लाख रुपयांची गुंतवणूक असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सभासद कल्याणाला प्राधान्य देत संस्थेमार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. सभासदांच्या वैद्यकीय उपचारांसाठी १० हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्याची योजना संस्थेने सुरू केली असून त्याचा लाभ अनेक सभासदांना होत आहे. याशिवाय सभासदांच्या पाल्यांचा पसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात येतो.

संस्थेच्या प्रगतीमध्ये संचालक मंडळाचे मोलाचे योगदान असल्याचे सांगताना बाळासाहेब घुले पाटील यांनी व्हाईस चेअरमन सचिन दांगट, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विकास (नाना) दांगट, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास मते, देविदास लगड, राजेंद्र हगवणे, विकास कोल्हे, नागनाथ शिंदे, राजेश देवकर, उद्योजक अभिजीत घुले पाटील, वीणादेवी मते तसेच माजी सरपंच मनीषा मोरे यांचे योगदान अधोरेखित केले.

तसेच तज्ज्ञ संचालक म्हणून ॲड. राजेश मिंडे व युवराज मोरे कार्यरत असून संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बापू यशवंती हे दैनंदिन कामकाजाची जबाबदारी सक्षमपणे सांभाळत आहेत.

"सभासदांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि सक्षम आर्थिक नियोजन यांच्या बळावर श्री रामेश्वर नागरी सहकारी पतसंस्था लवकरच शंभर कोटींचा टप्पा गाठेल," असा विश्वास चेअरमन बाळासाहेब घुले पाटील यांनी व्यक्त केला.

## जामको इंटिरिअर्सचे पुण्यात अत्याधुनिक केंद्र





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विमान कॅबिन इंटिरिअर्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी जामको इंटिरिअर्सने पुण्यात आपल्या अत्याधुनिक ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’चे उद्घाटन केले आहे. सात दशकांहून अधिक काळाचा जपानी एअरोस्पेस अभियांत्रिकी वारसा असलेल्या कंपनीची ही गुंतवणूक भारताला जागतिक विमान अभियांत्रिकी नेटवर्कमधील महत्त्वाचा भाग बनवणार असून महाराष्ट्राच्या एअरोस्पेस आणि प्रगत अभियांत्रिकी परिसंस्थेला नवी चालना देणार आहे. जामको इंटिरिअर्सच्या जागतिक विस्तार धोरणातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, पुण्यातील हे केंद्र विमान कॅबिनच्या संपूर्ण उत्पादन अभियांत्रिकीची जबाबदारी सांभाळणार आहे. संकल्पना विकास, प्रणाली रचना, सविस्तर डिझाइन, प्रमाणन सहाय्य, ड्रॉइंग रिलीज आणि कॉन्फिगरेशन नियंत्रण यांसारखी महत्त्वाची कामे या केंद्रातून केली जाणार आहेत.

त्यामुळे महाराष्ट्रातील अभियंत्यांना जागतिक दर्जाच्या एअरोस्पेस प्रकल्पांमध्ये थेट योगदान देण्याची संधी मिळणार आहे. जामको इंटिरिअर्स ही वाइडबॉडी विमानांसाठी लागणाऱ्या कॅबिन प्रणालींची जगातील प्रमुख पुरवठादार कंपनी आहे. बोईंग ७८७ आणि ७७७ विमानांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १०० टक्के लॅव्हेटरीज तसेच बोईंग ७८७ आणि एअरबस ए३५० विमानांतील मोठ्या प्रमाणातील गॅली प्रणालींचा पुरवठा कंपनीकडून केला जातो.

कंपनीच्या उत्पादनांमध्ये लॅव्हेटरीज, गॅलीज, बिझनेस क्लास आसने, ब्रँडिंग पॅनेल्स, विंडो शेड्स आणि गॅली इन्सर्ट्स यांचा समावेश आहे. जागतिक गुंतवणूक संस्था बेन कॅपिटलच्या पाठबळामुळे जामको इंटिरिअर्सला दीर्घकालीन क्षमता विकासात गुंतवणूक करण्याचे बळ मिळाले आहे. पुण्यातील अभियंते कंपनीच्या जागतिक प्रकल्प, उत्पादन आणि प्रमाणन नेतृत्व संघांसोबत थेट काम करत आंतरराष्ट्रीय प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावतील. जामको इंटिरिअर्सच्या कार्यकारी अध्यक्षा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी केट शेफर म्हणाल्या, “विमान कंपन्यांसाठी प्रवासी अनुभव सुधारण्यामध्ये आणि ब्रँडची वेगळी ओळख निर्माण करण्यामध्ये विमान कॅबिन इंटिरिअर्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे.

## कार्यकारी संचालक श्री. उमेश सांडू यांचे आकस्मिक निधन



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आयुर्वेद औषध निर्मिती क्षेत्रात गौरवशाली परंपरा लाभलेल्या सुप्रसिद्ध कंपनी सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे कार्यकारी संचालक, ५९ वर्षीय श्री. उमेश सांडू यांचे आज, शुक्रवार दि. १९ जून २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता चेंबूर येथील त्यांच्या घरी आकस्मिक निधन झाले. श्री. उमेश सांडू यांनी आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष प्रतिष्ठा मिळवून दिली. गोवा येथील कंपनीचा औषधनिर्माण कारखाना उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. औषधनिर्माण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबरोबरच सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातही त्यांचे मोठे स्थान होते. त्यांच्या निधनामुळे औषधनिर्माण क्षेत्रासह सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रात शोककळा पसरली असून, त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन मुली शिवानी आणि कनिष्का, आई, दोन भाऊ, कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच असंख्य हितचिंतक असा मोठा परिवार आहे. श्री. उमेश सांडू यांची अंतिम यात्रा उद्या, शनिवार दि. २० जून २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता सांडू कंपाऊंड, सांडू वाडी, चेंबूर, मुंबई येथून निघणार आहे.

# गणपतराव देशमुख यांची पक्षनिष्ठा आजच्या पुढाऱ्यांना का जमत नाही?




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विकासाचा रट्टा, आणि लोकशाहीची थट्टा किती दिवस..? स्व. गणपतराव देशमुख आबा, महाराष्ट्राच्या राजकारणात आज सुरू असलेल्या पक्षांतरांच्या, सत्तासमीकरणांच्या आणि राजकीय सोयीसाठी बदलणाऱ्या भूमिकांच्या पार्श्वभूमीवर तुमची आठवण मनाला चटका लावून जाते. निवडणुकीत एका विचारधारेच्या नावाने मते मागायची आणि निवडून आल्यानंतर सत्तेसाठी तीच भूमिका बदलायची, हा प्रकार पाहताना तुमच्यासारख्या तत्त्वनिष्ठ नेत्याची उणीव अधिक तीव्रतेने जाणवते. आजच्या गोंधळलेल्या राजकारणात तुमची निष्ठा, तुमचा संयम आणि तुमची मूल्यांशी असलेली बांधिलकी दीपस्तंभासारखी वाटते.

आबा, तुम्ही आयुष्यभर शेतकरी कामगार पक्षाशी एकनिष्ठ राहिलात. राज्यात अनेक सरकारे आली-गेली, सत्तेची समीकरणे बदलली, अनेकांना पदे, प्रतिष्ठा आणि संधी मिळाल्या; पण तुम्ही कधीही सत्तेच्या मोहाला बळी पडलात नाही. विचारांशी केलेली बांधिलकी तुम्ही शेवटपर्यंत जपलीत. राजकारण हे लोकसेवेचे व्रत आहे, सत्तेचा मार्ग नव्हे, हे तुम्ही आपल्या संपूर्ण आयुष्याने दाखवून दिले. विरोधी बाकांवर बसूनही जनतेसाठी झटता येते, विकासकामे करता येतात आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधता येतो, हे तुम्ही कृतीतून सिद्ध केले. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी तुम्ही सातत्याने लढलात. तुमची साधी राहणी, स्वच्छ प्रतिमा आणि लोकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते यामुळे तुम्ही केवळ नेता राहिलात नाहीत, तर लोकांच्या कुटुंबातील एक विश्वासू व्यक्ती बनलात.

आज अनेक नेते विकासासाठी सत्तेत जाणे आवश्यक असल्याचे सांगतात. पण आबा, तुमचे आयुष्यच त्या युक्तिवादाला उत्तर आहे. कारण विकासासाठी सत्तेपेक्षा प्रामाणिकपणा, सातत्य आणि जनतेप्रती असलेली निष्ठा अधिक महत्त्वाची असते. आज विचारांपेक्षा सत्ता, तत्त्वांपेक्षा पद आणि जनतेच्या विश्वासापेक्षा राजकीय सोय मोठी होताना दिसते, तेव्हा तुमची आठवण अधिक वेदनादायी होते.

आबा, म्हणूनच आज मनापासून प्रश्न पडतो की तुमची निष्ठा आणि संयम आजच्या पुढाऱ्यांना का जमत नाही? जनतेने दिलेला कौल, पक्षनिष्ठा आणि विचारधारा यांचा सन्मान करण्याऐवजी अनेक जण वैयक्तिक महत्त्वाकांक्षेला प्राधान्य देताना दिसतात. त्यामुळे मतदारांचा लोकशाहीवरील विश्वास डळमळीत होताना पाहून मन अस्वस्थ होते.

लोकशाही ही केवळ सत्तेची गणिते जुळविण्याची प्रक्रिया नाही; ती जनतेच्या विश्वासावर उभी असलेली पवित्र व्यवस्था आहे. त्या विश्वासाचे जतन करण्यासाठी तुमच्यासारख्या तत्त्वनिष्ठ नेतृत्वाची आज पूर्वीपेक्षा अधिक गरज आहे. आबा, तुम्ही आज आमच्यात नसाल, पण तुमचे विचार, तुमची निष्ठा आणि लोकसेवेचा आदर्श अजूनही जिवंत आहे. तुमच्या स्मृतींना वंदन करताना एकच आशा वाटते— आजच्या पिढीने तुमच्याकडून काही शिकावे, जेणेकरून राजकारणावरील जनतेचा विश्वास पुन्हा दृढ होईल आणि लोकसेवेचे खरे मूल्य पुन्हा उजळून निघेल.

विकासाचा रट्टा लावून लोकशाहीची थट्टा होत आहे..

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय परिश्रम घेऊन भारताचे संविधान लिहिले.

मात्र अशा काही घटनांनी मतदार राजा सुद्धा अवाक झाला आहे. देशभरात सत्तेची लालसा नेत्यांना लागत आहे. ही मोठी शोकांतिका आहे. अर्थात त्याला राजकीय गणितावरही हा सारीपाट रचला जातोय. आबा, तुम्ही शेकाप मध्ये असताना तुम्हाला आलेल्या ऑफर सोडून तुम्ही कष्टकरी आणि शेतकऱ्यांच्या पक्षात राहून विधानसभेत जाण्याचा विक्रम केला. आणि विकासही केला..

आत्ताचे लोकप्रतिनिधी पक्षांतर करून किती विकास करणार याकडे मतदारांसोबत सर्वांचं लक्ष असणार आहे.

**विनम्र अभिवादन आबा..**

## थोडक्यात पण महत्वाचे




### इंडस्ट्रीतील ओपन रिव्ह्यू प्रोग्रामची यशस्वी वाटचाल सुरू

पुणे (आरंभ पर्व) : एआय+ स्मार्टफोन्स ने आज 'नोव्हा 2 निओ 5जी' आणि 'नोव्हा 2 प्रो 5जी' सादर केले आहे. या नवीन मॉडेल्समुळे कंपनीच्या 'नोव्हा सिरीज' 'चा विस्तार झाला असून, भारतीय ग्राहकांना विश्वासार्ह, सुलभ आणि उत्कृष्ट कामगिरी देणारे स्मार्टफोन अनुभव पुरवण्याची त्यांची वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे. डिझाइन, विश्वासार्हता आणि पारदर्शकता या समान तत्त्वांवर आधारित असूनही, वेगवेगळ्या वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले नोव्हा2 निओ 5जी आणि नोव्हा2 प्रो 5जी हे स्मार्टफोन्स हे नोव्हा अनुभव एका व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचवतात, यामध्ये पहिल्यांदाच स्मार्टफोन वापरणारे ग्राहक आणि किंमतीचा विचार करणारे ग्राहक ते कंटेंट क्रिएटर्स, व्यावसायिक आणि उत्तम कामगिरीला प्राधान्य देणारे ग्राहक यांचा समावेश आहे. स्मार्टफोन लाँच करण्याच्या पारंपारिक पद्धतीं टाळत, 'एआय+ स्मार्टफोन्स'ने 'इंडियाज गॉट नोव्हा' या मनोरंजनावर आधारित कार्यक्रमाद्वारे आपली नवीन डिव्हाइसेस सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोदी कलाकार समय रैना आणि 'गॅझेट गुरू' राजीव मखनी यांनी केले. या लाँच सोहळ्यात प्रेक्षकांशी संवाद, प्रॉडक्टसचे प्रात्यक्षिक, थेट चर्चा आणि प्रत्यक्ष आव्हाने यांचा समावेश होता, ज्यामुळे ही डिव्हाइसेस अधिक वास्तववादी आणि ग्राहकाभिमुख पद्धतीने सादर करता आली.

### भारत बिल्डकॉन २०२६ मध्ये ₹४०० कोटींहून अधिक व्यवसाय



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : बांधकाम साहित्य, बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील भारतातील सर्वात मोठ्या प्रदर्शनांपैकी एक असलेल्या भारत बिल्डकॉन २०२६ ने यंदा अभूतपूर्व यश संपादन करत ₹४०० कोटींहून अधिक व्यावसायिक व्यवहार घडवून आणले. नवी दिल्लीतील यशोभूमी येथे आयोजित चार दिवसीय या मेगा प्रदर्शनाला जगभरातून ४० हजारांहून अधिक अभ्यागत, खरेदीदार आणि उद्योग प्रतिनिधींनी भेट दिली. ३० पेक्षा अधिक देशांतील आणि भारतातील १०० हून अधिक शहरांतील सहभागींच्या उपस्थितीमुळे भारत बिल्डकॉन २०२६ हे बांधकाम साहित्य क्षेत्रासाठी देशातील सर्वात मोठे 'एक राष्ट्र, एक प्रदर्शन' व्यासपीठ म्हणून उदयास आले. प्रदर्शनादरम्यान ८ हजारांहून अधिक उच्च क्षमतेचे व्यावसायिक संपर्क निर्माण झाले असून त्यापैकी अनेक भागीदारी आगामी काळात मोठ्या व्यावसायिक व्यवहारांमध्ये रूपांतरित होण्याची अपेक्षा आहे.

### रेल्वे सुरक्षा संशोधनासाठी नोव्हाची १०० कोटींची गुंतवणूक

NOVA
e2E RAIL

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : रेल्वे सिग्नलिंग, ट्रेन संरक्षण प्रणाली आणि कार्यप्रणाली तंत्रज्ञानातील सायबर सुरक्षा मजबूत करण्यासाठी नोव्हा कंट्रोल टेक्नोलॉजिक्सने पुढील काही वर्षांत १०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. ई२ई रेलची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या नोव्हाने रेल्वे सुरक्षेच्या नव्या युगात संशोधन, विकास आणि स्वदेशी तंत्रज्ञान निर्मितीवर भर देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. भारतीय रेल्वेकडून 'कवच' प्रणालीची अंमलबजावणी वेगाने सुरू असताना आणि रेल्वे व्यवस्थेचे डिजिटलीकरण वाढत असताना, रेल्वे सुरक्षेचा अविभाज्य भाग म्हणून सायबर सुरक्षेचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. याच पार्श्वभूमीवर कंपनीने ही मोठी गुंतवणूक जाहीर केली आहे. अलीकडेच पार पडलेल्या 'आयआरएसई कन्व्हेन्शन अँड एक्झिबिशन २०२६'मध्ये तज्ज्ञांनी रेल्वे सिग्नलिंग, ट्रेन संरक्षण आणि संवाद प्रणालींसोबतच कार्यप्रणाली तंत्रज्ञानातील सायबर सुरक्षेचा समावेश करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. ई२ई रेल आणि नोव्हा कंट्रोल टेक्नोलॉजिक्सचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी सौरजित मुखर्जी म्हणाले, "रेल्वे सुरक्षेच्या संकल्पनेत मूलभूत बदल होत आहेत. 'कवच'सारख्या प्रणालींमुळे गाडी संरक्षण क्षमता मजबूत झाली असली, तरी वाढते डिजिटलीकरण नवीन आव्हाने निर्माण करत आहे.

# सर्वेक्षण अहवालास मान्यता देऊन समाजाचे प्रश्न सोडवावेत

## पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडण्याची आमदार काळेंना बुडगा जंगम समाजाची विनंती

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

बुडगा जंगम समाजाच्या सर्वेक्षण अहवालास अंतिम मान्यता प्रदान करून जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राबाबत महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडण्याची विनंती महाराष्ट्र राज्य बुडगा जंगम विकास संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष व्यंकप्पा सुर्यवंशी यांनी खेडचे आमदार बाबाजी काळे यांच्याकडे केली आहे. याबाबतचे निवेदन आमदार बाबाजी काळे यांना समाजाच्या वतीने देण्यात आले आहे.

याबाबत बोलताना अध्यक्ष सुर्यवंशी म्हणाले की, बुडगा जंगम समाज हा महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये वास्तव्यास असून सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेल्या स्थितीत जीवन जगत आहे. समाजाच्या पारंपरिक भटक्या जीवनपद्धतीमुळे शासकीय अभिलेखांमध्ये समाजाची पुरेशी व अचूक नोंद उपलब्ध नाही. समाजातील नागरिकांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करताना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या माध्यमातून बुडगा जंगम समाजाचे राज्यस्तरीय सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. तथापि, सदर सर्वेक्षण पूर्ण होऊन अनेक वर्षांचा कालावधी लोटूनही अहवालास अंतिम मान्यता देण्यात आलेली नसल्यामुळे समाजातील विद्यार्थी, युवक, महिला व इतर नागरिक शासकीय योजना, शिष्यवृत्ती, शैक्षणिक सवलती, आरक्षणाचे लाभ व विविध विकासात्मक संधीपासून वंचित आहेत.

समाजातील अनेक नागरिकांकडे आवश्यक दस्तऐवज स्वरुपात पुरावे उपलब्ध नसल्याने जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अडथळे निर्माण होत आहेत. तसेच अनेक प्रकरणांमध्ये समाजातील व्यक्तीच्या नोंदी बहुरूपी, मसणजोगी, महादेव कोळी, कोळी, भिल्ल, बेलदार इत्यादी इतर जातीमध्ये झालेल्या असल्याने समाजाच्या मूळ सामाजिक ओळखीचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

याबाबत आमदार काळे यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात या मुद्द्यांवर लक्षवेधी सूचना अथवा प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधावे, आणि समाजाला न्याय मिळवून द्यावा. अशी विनंती निवेदनातून केली आहे.

यावेळी 'महाराष्ट्र बेडा-बुडगा जंगम विकास संघटना' व 'अखिल भारतीय बेडा-बुडगा जंगम कल्याणकारी संघ' यांचे पुणे जिल्हाध्यक्ष व्यंकप्पा सुर्यवंशी तसेच शरणाप्पा सुर्यवंशी , मारूती रूद्राक्ष, नरेश विभुते, राजू सुर्यवंशी, सुर्यकांत सुर्यवंशी, अशोक सुर्यवंशी, संभाजी रूद्राक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, आमदार काळे यांनी यावर समाजबांधवांशी सकारात्मक चर्चा करून योग्य पाऊल उचलण्याचे आश्वासन दिले आहे, असेही सुर्यवंशी यांनी सांगितले.



बुडगा जंगम समाजाच्या विविध मागण्यांविषयक पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडण्यासाठी आमदार बाबाजी काळेंना निवेदन देताना महाराष्ट्र राज्य बुडगा जंगम विकास संघटनेचे प्रतिनिधी. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर)

## अझीम प्रेमजी विद्यापीठात 'डेव्हलपमेंट लीडरशिप' पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

Azim Premji University

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अझीम प्रेमजी विद्यापीठात 'पोस्टग्रेज्युएट डिप्लोमा इन डेव्हलपमेंट लीडरशिप' (विकास क्षेत्रातील नेतृत्व गुण) या पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असुन अर्ज करण्याची शेवटची तारीख- ११ ऑक्टोबर २०२६ आहे हा ११ महिन्यांचा अर्धवेळ (पार्ट-टाईम) पदविका अभ्यासक्रम सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आणि विकास आराखडे, नागरी समाज व संस्थात्मक संस्कृती याविषयीची आपली दृष्टी अधिक समृद्ध करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी तयार करण्यात आला आहे. विकास क्षेत्रातील नेत्यांना सर्वसमावेशक संघ आणि संस्थांचे नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य या अभ्यासक्रमातून मिळते. विशेष म्हणजे, हा अभ्यासक्रम सुरू असतानाही प्रवेश घेतलेल्या व्यक्तींना त्यांचे सध्याचे काम किंवा नोकरी सुरू ठेवता येणार आहे. तीन सत्रांमध्ये विभागलेल्या या अभ्यासक्रमात विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून आणि ऑनलाईन अशा दोन्ही पद्धतींनी शिकण्याची संधी (ब्लेंडेड लर्निंग) दिली जाणार आहे. हा अभ्यासक्रम विकास क्षेत्रात आठ किंवा त्याहून अधिक वर्षांचा अनुभव असलेल्या मध्यम ते वरिष्ठ पातळीवरील व्यावसायिकांसाठी डिझाइन केला आहे; जे आधीपासूनच आपल्या संस्थेत नेतृत्वाची धुरा सांभाळत आहेत किंवा लवकरच अशी जबाबदारी स्वीकारणार आहेत.

## राजगुरूनगर-वाफगाव-शिरदाळेफाटा रस्त्याचे काम निकृष्ठ

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर - वाफगाव - शिरदाळेफाटा या रस्त्याचे काम निकृष्ठ होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. येथील रस्त्याच्या नूतनीकरन व रुंदीकरणाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. परंतु, रस्त्याच्या साईड पट्ट्यांवर माती व दगड वापरले जात असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहेत. अनेक वर्षांनंतर या रस्त्याचे नूतनीकरण होत असल्याने हा रस्ता दर्जेदार व्हावा, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे. राजगुरूनगर ते वाफगाव हा बारा किलोमीटर लांबीचा रस्ता आहे. खेड तालुक्याच्या पूर्व भागातील तसेच शिरूर व आंबेगाव तालुक्यातील अनेक गावांना जोडणार हा मार्ग आहे. तसेच पुणे-नाशिक महामार्गासाठी पर्यायी मार्ग म्हणूनही या रस्त्याचा अनेकदा वापर केला जातो. त्यामुळे या रस्त्याने मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. हा रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत खराब झाला होता या संदर्भात वेळोवेळी परिसरातील नागरिक व प्रसारमाध्यमांनी आवाज उठवला होता. या रस्त्याच्या कामासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला असून सुमारे एक वर्षभरापासून नूतनीकरणाचे काम सुरू आहे. रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच रस्त्याचे काँक्रीटीकरण करताना रस्त्याला पुरेसे पाणी मारले जात नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. कॉक्रीटीकरण झाल्यावर रस्त्याच्या साईड पट्ट्या भरताना माती मिश्रित मुरूम व काही ठिकाणी फक्त मातीचाच मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला असल्याचे नागरिकांनी सांगितले.

गुरुवारी (दि.१७) सकाळी जरेवाडी ते ठाकरवाडी फाट्यादरम्यान रस्त्याच्या साइडपट्ट्या भरण्यासाठी माती वापरण्यात आली होती. याबाबत संबंधित ठेकेदार कंपनी व अधिकाऱ्यांना कळल्यानंतर माती काढण्यात येईल असे सांगितले परंतु दुपार पर्यंत त्या ठिकाणच्या साईड पट्ट्या तशाच मातीने भरून रोलर फिरवण्यात आला होता. ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे या भागातील ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. ज्या ठिकाणी साईडपट्ट्या मातीने भरल्या आहेत तेथील माती काढून साईड पट्ट्या मुरुमाने भराव्यात अशी मागणी धनंजय भागवत व ग्रामस्थांनी केली आहे.



## कवयित्री संध्याराणी कोल्हे यांना 'विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार'

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

कवयित्री, लेखिका, तत्त्वस्नेही व उपक्रमशील शिक्षिका श्रीमती संध्याराणी कोल्हे यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. विश्वबंधुता साहित्य परिषद, विश्वबंधुता मूल्य संवर्धन समिती आणि काषाय प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार देण्यात आला.

पुणे येथील पत्रकार भवनातील एस. एम. जोशी सभागृहात २ जून २०२६ रोजी आयोजित विश्वबंधुता साहित्य संमेलनात पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी विश्वधर्म बंधुता ग्रंथ प्रकाशन, विश्वबंधुता दिन, बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा तसेच निमंत्रित कवी-कवयित्रींचे कवीसंमेलन आयोजित करण्यात आले होते. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कविवर्य प्रा. चंद्रकांतदादा वानखेडे, स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. अरुण आंधळे, बंधुताचार्य प्रकाश रोकडे व मंदाकिनी रोकडे यांच्या हस्ते संध्याराणी कोल्हे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी अ‍ॅड. प्रार्थना सदावर्ते, डॉ. वसंत बगडे, डॉ. अशोककुमार पगारिया, प्रा. शंकर अथरे, प्रा. भारती जाधव आणि प्रा. संगीता झिंजुर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. संमेलनाचे संयोजन प्रा. शरयू पवार, डॉ. सविता पाटील, डॉ. बंडोपंत कांबळे, प्रा. सायली गोसावी, प्रा. प्रशांत रोकडे, कवी तुकाराम कांबळे, सीमा गांधी, विद्या अटक आणि सुनील बोरसे यांनी केले. जिल्हा बीडमधील केज तालुक्यातील लाखा (मराठी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या संध्याराणी कोल्हे यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल साहित्य, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संध्याराणी कोल्हे यांचे 'मनतरंग' हा षटकोळी काव्यसंग्रह, 'काव्यामृत', 'काव्यसार' आणि 'अभंगगंगा' हे काव्यसंग्रह तसेच 'पुष्पबहर' हा चारोळी संग्रह प्रकाशित झाला आहे. याशिवाय 'षटकोळीची गुंफण', 'रिमझीम षटकोळी', 'काव्यसागर' आणि 'काव्यप्रेमींची गुंफण' हे प्रातिनिधिक षटकोळी काव्यसंग्रहही प्रकाशित झाले आहेत. विविध दिवाळी अंकांमधून त्यांच्या कविता व लेख प्रकाशित झाले असून साहित्य व शिक्षण क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना आतापर्यंत ३५ हून अधिक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.



## शॉपर्स स्टॉपने द पॅव्हेलियन मॉलमध्ये नवीन फ्लॅगशिप स्टोअर केले सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शॉपर्स स्टॉप या भारतातील प्रीमियम फॅशन, ब्युटी आणि गिफ्टिंग गंतव्याने पुण्यातील पॅव्हेलियन मॉल येथे आपल्या नवीन फ्लॅगशिप स्टोअरच्या लाँचची घोषणा केली आहे. यासह महाराष्ट्रातील सर्वात गतिमान आणि वेगाने वाढणारी ग्राहक बाजारपेठ पुणे शहरात कंपनीने आपली रिटेल उपस्थिती अधिक दृढ केली आहे. पुण्यामध्ये शॉपर्स स्टॉपचे हे सहावे स्टोअर आहे.

२५,४८३ चौरस फूट क्षेत्रफळात पसरलेले हे नवीन स्टोअर ग्राहकांना खरेदीचा उच्च दर्जाचा आणि विशेष अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे. येथे प्रीमियम फॅशन, सौंदर्य उत्पादने, ॲक्सेसरीज, फूटवेअर, लगेज आणि लाइफस्टाइल ब्रँड्सची विस्तृत श्रेणी एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. केवळ खरेदीच्या पलीकडे जाऊन एक उत्तम ठिकाण म्हणून विकसित केलेल्या या स्टोअरमध्ये ग्राहकांसाठी अनेक अनुभवात्मक सुविधा समाविष्ट केल्या आहेत. यामध्ये एक समर्पित पर्सनल शॉपर लाउंज, किड्स प्ले एरिया आणि गेमिंग आर्केड यांचा समावेश आहे, ज्यामुळे ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी सोयीस्कर आणि आनंददायी वातावरण तयार होते.




# जामको इंटिरिअर्सचे पुण्यात 'सेंटर ऑफ एक्सलन्स'

## जागतिक विमान कॅबिन अभियांत्रिकीला नवी दिशा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विमान कॅबिन इंटिरिअर्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी जामको इंटिरिअर्सने पुण्यात अत्याधुनिक सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू केले असून, भारताला आपल्या जागतिक अभियांत्रिकी नेटवर्कमधील महत्त्वाचा आधारस्तंभ बनविण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. सात दशकांहून अधिक अभियांत्रिकी वारसा असलेल्या कंपनीची ही सुविधा महाराष्ट्रातील एरोस्पेस आणि प्रगत अभियांत्रिकी क्षेत्राच्या विकासाला नवी गती देणार आहे.

नवीन केंद्रामध्ये विमान कॅबिनच्या संपूर्ण उत्पादन अभियांत्रिकीची जबाबदारी पार पाडली जाणार असून संकल्पना विकास, प्रणाली रचना, सविस्तर डिझाइन, प्रमाणन सहाय्य, तांत्रिक आराखडे आणि कॉन्फिगरेशन नियंत्रण यांसारख्या महत्त्वाच्या कामांचा समावेश असेल. या माध्यमातून महाराष्ट्रातील कुशल अभियंत्यांना जागतिक दर्जाच्या एरोस्पेस प्रकल्पांवर थेट काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

जामको इंटिरिअर्स ही वाइडबॉडी विमानांसाठी लॅव्हेटरी, गॅली प्रणाली आणि बिझनेस क्लास आसनव्यवस्थेची जगातील प्रमुख पुरवठादार कंपनी आहे. कंपनी बोईंग ७८७ आणि ७७७ विमानांसाठी शंभर टक्के लॅव्हेटरी प्रणाली पुरवते, तर वाइडबॉडी गॅली प्रणालींच्या जागतिक बाजारातही तिचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

कंपनीच्या कार्यकारी अध्यक्षा व मुख्य कार्यकारी अधिकारी केट शेफर म्हणाल्या की, विमान कंपन्यांच्या स्पर्धात्मकतेमध्ये आधुनिक कॅबिन इंटिरिअर्सची भूमिका दिवसेंदिवस वाढत आहे. पुण्यातील ही गुंतवणूक भारताच्या अभियांत्रिकी क्षमतेवरील दीर्घकालीन विश्वासाचे प्रतीक असून, भविष्यातील जागतिक प्रकल्पांसाठी हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजावेल. भारत हा जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या विमान वाहतूक बाजारपेठांपैकी एक असल्याने विमानांचे आधुनिकीकरण, रेट्रोफिटिंग आणि कॅबिन सुधारणा यांसाठी प्रगत अभियांत्रिकीची मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पुणे केंद्र भारतीय विमान वाहतूक उद्योगाला जागतिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचे काम करणार आहे.

जामको इंटिरिअर्सचे मुख्य परिचालन अधिकारी संजीव सेन यांनी सांगितले की, भारतातील विमान वाहतूक उद्योग आता नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. विमान खरेदी आणि प्रवासी वाढ यापलीकडे जाऊन जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकी, प्रमाणन, उत्पादन तयारी आणि पुरवठा साखळी क्षमतांची उभारणी महत्त्वाची ठरणार आहे. पुणे सेंटर ऑफ एक्सलन्स या दिशेने महत्त्वपूर्ण योगदान देईल.

